cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–१९५ शुक्रवार, दि.८ नोव्हेंबर २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### मनसेला वेळ साधता आली नाही...

महाराष्ट्र नवनिर्माण सेना या महाराष्ट्रातील राज ठाकरे यांच्या पक्षाविषयी लोकांच्या आणि मीडियाच्या मनात कायमच कुतूहल राहिले आहे. या विधानसभा निवडणुकीला मनसे हा पक्ष स्वतंत्र अस्तित्व दाखवत स्वतःचा बाणा पुन्हा दाखवण्याच्या तयारीत असेल असे सगळ्यांनाच वाटले होते. पण याही निवडणुकीत मनसेच्या या स्वतंत्र बाण्याची कोंडीच झालेली पाहायला मिळाली आहे. महाराष्ट्राला काँग्रेसप्रणित आघाडी आणि भाजपप्रणित आघाडी यांच्यापेक्षा काही तिसरा नवीन भक्कम पर्याय मिळाला तर हवा होता. किंबहुना राज्यातील काही मतदार अशा वेगळ्या प्रयोगाला कदाचित साथ देण्याच्या मनस्थितीत होते. त्या दृष्टीने मनसेकडे अनेकांचे लक्ष होते. पण मनसेची स्थिती आज पुन्हा कोंडीत सापडल्यासारखी दिसत आहे.

### उमेदवार पाडापाडीचा निर्णय एक-दोन दिवसांत-मनोज जरांगे

जालनाः लोकसभा निवडणुकीत मी कोणाचेही उमेदवार पाडले नाहीत. मराठ्यांनी पाडले, मी गरीब माणूस आहे. हे मात्र खरे आहे. गरीबांत किती ताकत आहे, हे देशाने आणि महाराष्ट्राने बघितले. आता विधानसभा निवडणुकीसाठी पाडापाडीचा निर्णय एक-दोन दिवसांत होईल. त्यासाठी एक ते दोन दिवस पुरेसे आहेत, असे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी गुरूवारी (दि. ७) सांगितले. ते अंतरवाली सराटी येथे पत्रकारांशी बोलत होते. मी सामाजिक कामासाठी बाहेर आहे. हा लढा सुरु ठेवायचा आहे आणि जिंकायचा आहे. मला हे बघायचे होते, उमेदवार दिले होते, आजही लोक तितकेच आहेत.

# शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची आम्ही शोबाजी केली नाही !



## उद्धव ठाकरे यांचे महायुती सरकारवर जोरदार टीकास्त्र

अमरावती । प्रतिनिधी

शेतकऱ्यांसाठी आम्ही निर्णय घेतला. मात्र आम्ही असो किंवा मी यावरून कधीच मोठी शोबाजी केली नाही. मी जे ठरवलं होतं ते काही उपकार म्हणून नाही केलं तर ते माझं कर्तव्य म्हणून केल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. पण आज राज्यात हे तीन भाऊ, सगळे मिळून महाराष्ट्र खाऊ, अशा अविर्भावात वावरत आहेत, अशीही टीका उद्धव ठाकरेंनी महायुतीवर केली आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी विधानसभा निवणडणुकीच्या निमित्ताने प्रचार सभा घेण्यास सुरूवात केली आहे. यावेळी त्यांनी अमरावतीमध्ये शिवसेना आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारासाठी प्रचार सभा गरूवारी (दि.७) घेतली. या सभेतून त्यांनी मविआचे सरकार असताना शेतकऱ्यांची कर्ज मुक्ती केली. पण बडेजाव किंवा शोबाजी केली नाही, असे टीकास्त्र महायुती सरकारवर त्यांनी सोडले. ठाकरे पुढे म्हणाले, आमचे सरकार कोरोना काळातही चांगले काम करत होते. मात्र ते पाडले. आम्ही शेतकऱ्यांसाठी काम करत होतो. आमच्या महाविकास आघाडीच्या सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली. प्रोत्साहनपर अनुदान दिले पण आमचे चांगले काम यांना पाहवले नाही. यावेळी त्यांनी महायुतीच्या तिन्ही नेत्यांना पंतप्रधान मोदी म्हणतात तसे शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करून दाखवले तर मी सर्व उमेदवार मागे घेतो असे आव्हान देखील दिले आहे. ◀◀ पान २ वर

## काँग्रेसचा बंडखोरांना दणका, सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित!

### जाहिरनामा १० नोव्हेंबरला, राहूल गांधींच्या १२ पासून सभा



मुंबई । प्रतिनिधी

महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांविरुद्ध विधानसभा निवडणूक लढविणाऱ्या पक्षीय बंडखोरांना सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे, अशी माहिती काँग्रेस महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्निथला यांनी गुरूवारी (दि.७) पत्रकार परिषदेत दिली.

चेन्निथला म्हणाले की, ''महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या काँग्रेस पक्षातील बंडखोरांची यादी तयार करण्यास सांगितले आहे. त्यांना नोटीस बजावण्याची सूचना जिल्हा काँग्रेसला देण्यात आली आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडी कोठेही मैत्रीपूर्ण लढत लढणार नाही. ◀◀ पान २ वर

## राडी जिल्हा परिषद गटात धनंजय मुंडेंच्या प्रचाराचा झंझावात

# विकासात आणि सुख-दुःखात मी वाटेकरी, मला आशीर्वाद द्या-धनंजय मुंडे

### धनुभाऊ तुम्ही महाराष्ट्रात फिरा, परळी आम्ही सांभाळतो, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दिला विश्वास

अंबाजोगाई । प्रतिनिधी

परळी मतदारसंघाच्या अंबाजोगाई तालुक्यातील राडी जिल्हा परिषद गटात विविध गावांमध्ये बुधवारी दिवसभर धनंजय मुंडे यांच्या प्रचाराचा झंजावात पाहायला मिळाला. धनंजय मुंडे यांनी बुधवारी सकाळच्या सत्रात राडी, दैठणा मुडेगाव, राडी तांडा येथे कॉर्नर बैठका घेतल्या; तर सायंकाळच्या सत्रात धानोरा बुद्रुक, तडोळा व अकोला या गावांमध्ये कॉर्नर बैठका घेतल्या. या सर्वच गावांमधून धनंजय मुंडेंना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, प्रत्येक कॉर्नर बैठकीला अगदी जाहीर सभेचे स्वरूप आल्याचे पाहायला मिळाले.

माझी जात आणि धर्म हा विकास आहे. आम्हाला स्वर्गीय मुंडे साहेब व स्वर्गीय पंडित अण्णा यांनी सर्वसमावेशक विकासाचे राजकारण शिकवले. या मातीतील माणसाच्या विकासासाठी आणि कल्याणासाठी मी माझे आयुष्य समर्पित केले आहे. इथल्या विकासाच्या प्रत्येक विटेमध्ये आणि इथल्या माणसाच्या सुख-दुःखामध्ये मी कायम वाटेकरी आहे. त्यामुळे मांजरपट्ट्यातील या भागातून



मला भरभरून मतदान रुपये आशीर्वाद मिळेल असा मला विश्वास असल्याचे धनंजय मुंडे यांनी या बैठकांमधून व्यक्त होताना सांगितले. धनंजय मुंडे हे राज्याचे नेतृत्व असून, तुम्ही आता संपूर्ण राज्यात पक्षाच्या व महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारात फिरावे. परळी विधानसभा मतदारसंघात तुमचा प्रत्येक कार्यकर्ता हा स्वतःची निवडणूक समजून लढेल. तुम्ही या निवडणुकीची जबाबदारी आमच्यावर सोडा आणि बिनधास्त सबंध महाराष्ट्रात फिरा, असा विश्वास यावेळी गावातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी धनंजय मुंडे यांना दिला. गावागावात आगमन होताच स्थानिक गावकऱ्यांनी मोठ्या जल्लोषात कुठे बँड लावून, कुठे फटाके फोडून तर कुठे महिला भगिनींच्या हस्ते औक्षण करून धनंजय मुंडे यांचे जोरदार स्वागत केले. गावात आगमन होताच धनंजय मुंडे यांनी त्या त्या गावातील महापुरुषांच्या स्मारकांना अभिवादनही केले. सकाळच्या सत्रात मा. आमदार संजय भाऊ दौंड, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, ज्येष्ठ नेते दत्ता आबा पाटील, गोविंदराव देशमुख, राजाभाऊ औताडे, विलास काका सोनवणे, बी सी गंगणे, रणजीत लोमटे, गणेश कराड, तानाजी देशमुख, नरसिंह कदम, ◀◀ पान २ वर

## विकासासाठी खेचून आणलेल्या निधीचा योग्य वापर करून घेण्यासाठी पुन्हा एकदा संधी द्या-आ.लक्ष्मण पवार

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई मतदारसंघातील बदलत्या परिस्थितीचे आपण सर्वजण साक्षीदार आहात. मागील दहा वर्षाच्या काळात मतदारसंघातील प्रत्येक अडचण समजुन घेत अनेक अडचणी मार्गी लावण्यासाठी मी प्रमाणिक प्रयत्न केले आहेत. मतदारसंघातील विकास कामासाठी हजारो कोटी रुपये खेचून आणत दर्जेदार कामे करून घेतली आहेत. अनेक



ठिकाणी कामे सुरू आहेत, या सर्व निधीचाही योग्य वापर व्हावा यासाठी तालुक्यातील मायबाप जमतेने मला पुन्हा संधी द्यावी असे आवाहन आ.लक्ष्मण पवार यांनी केले. गेवराई विधानसभा निवडणुकीच्या ◀◀ पान २ वर

## विधानसभेनंतर शिक्षण, नोकऱ्यांतील आरक्षण जाणार

### ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे भाकित

मुंबई । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाने थांबवण्यात आले आहे. विधानसभेच्या माध्यमातून शिक्षण आणि नोकऱ्या यामधील आरक्षण थांबवले जाईल. हे आपल्याला मान्य आहे का? मान्य नसल्यास किंतु, परंतुची चर्चा न करता वंचित बहुजन आघाडीने उभे



केलेले ओबीसींचे, एससी, एसटी आणि मुस्लीम उमेदवार की ज्यांची निशाणी गॅस सिलिंडर ◀◀ पान २ वर

## अनिलदादांनी फोडला प्रचाराचा नारळ!

### बीड मतदार संघातील देवस्थानी नतमस्तक

बीड । प्रतिनिधी

गेल्या चाळीस वर्षाच्या राजकीय प्रवासात निःस्वार्थपणे बीडवासियांची सेवा करत आलेले अनिलदादा जगताप हे केवळ बीड विधानसभेचे अपक्ष उमेदवार नसून अनिलदादा हा बीडवासियांचा झंजावत आहे आणि याच झंजावाताला प्रारंभ झाला असून अनिलदादा जगताप यांनी माजी राज्यमंत्री प्रा. सुरेशजी नवले आणि आपल्या हजारो



सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्र परिवाराच्या चारशे गाड्यांचा ताफा घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करून वंदन केले व त्यानंतर नवगण राजुरी येथे गणपतीचे दर्शन घेऊन श्री क्षेत्र नारायण गड येथे श्री नगद नारायणाचे आशीर्वाद घेत त्यांच्या ◀◀ पान २ वर

### 'सत्ता आल्यास मशिदीवर एकही भोंगा ठेवणार नाही'

अमरावतीः सगळे टोल नाके बंद झाले आहेत. त्याबद्दल कोणीही बोलत नाहीत. इतर कोणत्याही राजकीय पक्षाने या मुद्दा उचलला नाही. कारण सगळ्यांचे हात त्या टोलमध्ये अडकले होते असे वक्तव्य महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे ◀◀ पान २ वर

## माजलगावात रमेश आडसकरांची ताकद वाढणार

### मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक यांचा आडसकरांना पाठिंबा

माजलगाव । पतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदार संघातील राजकारणात दररोज नवे-नवे समिकरण जुळून येत आहेत.अपक्ष उमेदवार रमेश आडसकर यांची ताकद दिवसेंदिवस वाढत असुन माजी आ.मोहनराव सोळंके,माजी आ.राधाकृष्ण होके पाटील अशा मातब्बर नेत्यांची साथ मिळाल्यानंतर आता जेष्ठ नेते तथा मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी देखील रमेश आडसकर यांना पाठींबा देण्याचा निर्णय घेतला आहे. आडसकर आणि डक कुटूंबियांमध्ये असलेले जुने संबंध, रमेशराव आणि अशोक डक या दोघांचा दोस्ताना अखेर कामी आला आहे.डक यांच्या पाठींब्यामुळे आडसकरांची





ताकद चांगलीच वाढली आहे.याचा परिणाम प्रतिस्पर्धी उमेदवारांना भोगावा लागणार आहे.

माजलगाव मतदार संघात अशोक आबा डक यांना मानणारा मोठा वर्ग आहे. त्यांच्या शब्दाला देखील तेवढेच वजन आहे. पक्षीय राजकारणाच्या ◀◀ पान २ वर

## विकासाचा बॅकलॉग भरून काढू-डॉ.योगेश क्षीरसागर

शिरूर कासार । प्रतिनिधी

महायुतीचे बीड विधानसभेचे उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी मतदारसंघात प्रचाराचा झंझावात सुरू केला असून शिरूर कासार तालुक्यात गुरुवारी (दि.७) प्रचार दौरा केला. दौऱ्यात डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड मतदारसंघात मागील पाच वर्षात विकासकामे झाली नाहीत. हा विकासाचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी आपण प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही महायुतीचे बीड विधानसभेचे उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी दिली.



शिरूर कासार तालुक्यात सकाळी ७ वाजल्यापासून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचाराचा झंझावात सुरू झाला होता. दुपारपर्यंत फुलसांगवी, मार्कंडवाडी, हाजीपुर, गाजीपुर,जांब, शिरापूर गात, पौंडूळ क्र.३, कमलेश्वर धानोरा, आर्वी, लिंबा खांबा, खलापुरी, नगरेवाडी, तागडगाव, हिवरसिंगा, रायमोहा व आजूबाजूच्या वाड्यावर जाऊन ग्रामस्थांशी संवाद साधत येत्या २० तारखेला मला मतदान करून आपले प्रश्न मार्गी लावण्यासाठी विधानसभेत पाठवावे, असे आवाहन केले. त्यांच्या दौऱ्यास मतदारसंघात मोठा प्रतिसाद पहावयास मिळत आहे. शिरूर कासार तालुक्यातील प्रचाराची सुरुवात फुलसांगवी येथून झाली. फुलसांगवी येथे संत वामनभाऊ महाराज यांच्या मंदिरात जाऊन दर्शन घेतले. यावेळी गावकऱ्यांशी संवाद साधताना डॉ.योगेश क्षीरसागर यांनी ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.७ नोव्हेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७.५० क्विंटल | २,७११ | २,७११ | २,७११ |
| ज्वारी/हायब्रिड: ३१.०० क्विंटल | १,६४० | २,८०० | २,१४९ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर :७.५० क्विंटल | ८,६०० | ८,६०० | ८,६०० |
| उडीद :४.५० क्विंटल | ७,२५१ | ७,३०० | ७,२७५ |
| बाजरी: ३४.०० क्विंटल | २,२०० | ७,५०१ | ३,१२६ |
| मुग : ०.५० क्विंटल | ७,२०० | ७,२०० | ७,२०० |
| सोयाबीन: २२८.०० क्विंटल | ३,३०० | ४,२२१ | ४,०४६ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ६,८०१ | ७,७०० | ७,२५० |

# आरोपी अन् पीडिता यांच्यात तडजोड झाली तरी लैंगिक छळाचा खटला रद्द होणार नाही–सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली । वृतसंस्था

लैंगिक छळ प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने मोठी टिप्पणी केली आहे. केवळ आरोपी आणि पीडिता यांच्यातील तडजोडीच्या आधारावर लैंगिक छळाचा खटला रद्द केला जाऊ शकत नाही, असे मत सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी (दि. ७) एका प्रकरणात नोंदविले. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने राजस्थान उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द केला, ज्यामध्ये न्यायालयाने खटला रद्द करण्यासाठी सीआरपीसीच्या कलम ४८२ अंतर्गत आपल्या अधिकारांचा वापर केला होता.



राजस्थान उच्च न्यायालयाने अल्पवयीन विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी दोषी शिक्षक विमल कुमार गुप्ता यांना दिलासा दिला होता. हे प्रकरण २०२२ मधील गंगापूरचे आहे. आरोपी आणि पीडिता यांच्यात तडजोड झाली होती. सुरुवातीला कनिष्ठ न्यायालयाने याला नकार दिला होता, मात्र उच्च न्यायालयाने ती तडजोड मान्य केली होती. यानंतर सामाजिक कार्यकर्ते रामजी लाल बैरवा यांनी उच्च न्यायालयाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. तपासादरम्यान अल्पवयीन मुलाचा जबाबही नोंदवण्यात आला. मात्र, त्यानंतर पीडित मुलीचे कुटुंब आणि आरोपी यांच्यात तडजोड झाली, ज्याच्या आधारे आरोपीने हे प्रकरण रद्द करण्यासाठी राजस्थान उच्च न्यायालयात धाव घेतली. आरोपी गुप्ता याने स्टॅम्प पेपरवर मुलीच्या कुटुंबीयांचे जबाब घेतले होते. गैरसमजातून त्यांनी पोलिसात तक्रार केल्याचे सांगण्यात आले आणि आता त्यांना शिक्षकावर कोणतीही कारवाई नको, असे त्यात म्हटले. उच्च न्यायालयाने ही याचिका मान्य करून फौजदारी खटला रद्द केला होता.

सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती सीटी रविकुमार आणि न्यायमूर्ती पीव्ही संजय कुमार यांच्या खंडपीठाने ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# मनसेला वेळ साधता आली नाही...

महाराष्ट्र नवनिर्माण सेना या महाराष्ट्रातील राज ठाकरे यांच्या पक्षाविषयी लोकांच्या आणि मीडियाच्या मनात कायमच कुतूहल राहिले आहे. या विधानसभा निवडणुकीला मनसे हा पक्ष स्वतंत्र अस्तित्व दाखवत स्वतःचा बाणा पुन्हा दाखवण्याच्या तयारीत असेल असे सगळ्यांनाच वाटले होते. पण याही निवडणुकीत मनसेच्या या स्वतंत्र बाण्याची कोंडीच झालेली पाहायला मिळाली आहे.

महाराष्ट्राला काँग्रेसप्रणित आघाडी आणि भाजपप्रणित आघाडी यांच्यापेक्षा काही तिसरा नवीन भक्कम पर्याय मिळाला तर हवा होता. किंबहुना राज्यातील काही मतदार अशा वेगळ्या प्रयोगाला कदाचित साथ देण्याच्या मनस्थितीत होते. त्या दृष्टीने मनसेकडे अनेकांचे लक्ष होते. पण मनसेची स्थिती आज पुन्हा कोंडीत सापडल्यासारखी दिसत आहे. मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी आपण महायुतीबरोबर सत्तेत बसणार आहोत, असा दावा केला आहे. त्यामुळे त्यांचा पक्ष हा महायुतीतलाच पक्ष म्हणून मतदार जमेला धरणार असतील, तर या पक्षाला आता फार आश्वासक वातावरण असणार नाही अशी चिन्हं आहेत.

प्रत्यक्ष प्रचाराच्या आधीच राज ठाकरे यांनी एका मुलाखतीत आमचा पक्ष आता सत्तेत असेल आणि महायुतीच सत्तेवर येईल असे जे प्रतिपादन केले त्याचा तपशील बघितला तर असे लक्षात येते की राज ठाकरे यांना भाजपच्या अंगानेच राजकारण करावे असे वाटू लागले आहे. त्यांच्या या भूमिकेचा राज ठाकरे यांना नेमका किती फायदा होतो हे पहावे लागेल. पण जर राज्यातील वातावरण महायुतीच्या विरोधात असेल तर त्या वातावरणाचा मोठा फटका राज ठाकरे यांना बसू शकतो हे सांगण्यासाठी राजकीय जाणकारांच्या प्रतिपादनाची गरज नाही. मात्र, त्याच वेळी मनसे महायुतीच्या सरकारला पाठिंबा देणार, या राज ठाकरे यांच्या भूमिकेचा महायुतीच्या उमेदवारांना कितपत लाभ होईल याचा अंदाज लागत नाही. ही सगळी भूमिकांची अदलाबदल आणि कोलांट्या सुरू असतानाच महायुतीतलाच एकनाथ शिंदे यांचा पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यातच कडाक्याची जुगलबंदी रंगल्याचे पाहायला मिळाले आहे. माहिमच्या जागेवर राज ठाकरे यांचे चिरंजीव निवडणूक लढवत आहेत. अमित ठाकरे यांची ही पहिलीच निवडणूक असल्याने त्यांच्यासाठी सुरक्षित वातावरण तयार करणे गरजेचे होते. त्यासाठी राज ठाकरे यांनी भाजपच्या साथीने प्रयत्न केले पण त्यांना सदा सरवणकर यांची उमेदवारी आड आली. सरवणकर यांना माघार घ्यायला लावणे हे काही फार आव्हानात्मक काम नव्हते. पण त्यातही राज ठाकरे यांना यश आलेले पाहायला मिळाले नाही. एकनाथ शिंदे आणि राज ठाकरे यांच्यात गोडीगुलाबीचे संबंध आहेत असे अनेक वेळा स्पष्ट झाले आहे. त्याचा वापर करून एकनाथ शिंदे यांच्यामार्फत सदा सरवणकर यांना माघार घ्यायला लावणे हे तुलनेने सोपे काम होते, पण हे पडद्यामागचे राजकारणसुद्धा राज ठाकरे यांना समर्थपणे करता आले नाही. राज ठाकरे यांचे दुर्दैव असे की खुद्द फडणवीस आणि भाजपची साथ असतानाही मुख्यमंत्र्यांचाच पक्ष माहीममध्ये त्यांच्या विरोधात उभा आहे. फडणवीस यांच्या मार्फत सुद्धा सरवणकर यांना खाली बसवता आले असते, तेही मनसेला जमले नाही. राजकारणात बेरीज, वजाबाकी आणि पडद्याआडच्या खेळ्या यांना फार महत्त्व असते. काही वेळेला पूर्ण अनुकूल स्थिती असूनही ती नेमकी जोखता न आल्याने राजकारणात अपयश पदरात पडते. तोच अनुभव राज ठाकरे यांच्या मनसेला वारंवार येताना दिसतो आहे. भाजपच्या मदतीने एकनाथ शिंदे यांना कोंडीत पकडून अमित ठाकरे यांच्या विजयाचा मार्ग सुकर करणे सहज शक्य असताना तिकडे सरवणकर यांनीच राज ठाकरे यांना कोंडीत पकडल्याचे पाहायला मिळत आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या विरोधातील उमेदवार जर मनसे मागे घेणार असेल तर आपण माहीममधून माघार घेऊ, अशी बेरकी भूमिका सरवणकर यांनी घेतली आणि त्यांनी राज ठाकरे यांनाच चौफेर कोंडीत पकडले. या पार्श्वभूमीवर सध्या निवडणूक प्रचार दौऱ्याला बाहेर पडलेले राज ठाकरे हे अजित पवार आणि एकनाथ शिंदे या महायुतीतल्या महत्त्वाच्या नेत्यांवरच टीका करताना दिसत आहेत. त्यामुळे ते नेमके सध्या कोठे उभे आहेत हे त्यांच्या समर्थक आणि कार्यकर्त्यांनाच उमगेनासे झाले आहे. ही स्थिती लक्षात घेतली तर याही निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला फार भरभक्कम यश मिळेल असा दावा कोणालाही करता येणार नाही. वास्तविक लोकसभा निवडणुकीत भाजपाला एकतर्फी पाठिंबा देऊन आपले उमेदवार उभे न करण्याचा निर्णय राज ठाकरे यांनी घेतल्यानंतर विधानसभेची तयारी करण्यासाठी त्यांना सहा महिन्यांचा अवधी होता. पण त्या अवधीचाही त्यांनी फार लाभ करून घेतलेला दिसला नाही.

जर स्वबळावरच लढायचे होते तर महायुती आणि महाविकास आघाडी यांच्या खूप आधीच आपले उमेदवार जाहीर करून त्यांनी निवडणुकीचे रणांगण गाजवायला सुरुवात करायला हवी होती. तेथेही हा पक्ष आणि त्यांचे नेतृत्व कमी पडलेले दिसले. मुळात राज ठाकरे यांच्याविषयी जनतेमध्ये कमालीचे आकर्षण असतानाही आणि त्यांच्याकडे सर्व राज्यभर युवक कार्यकर्त्यांची दमदार फळी असतानाही हा पक्ष केवळ योग्य वेळी योग्य भूमिका न घेतल्याची फळे भोगताना दिसत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातले एक चांगले नेतृत्व पुन्हा कोंडीत सापडले आहे, असेच म्हणावे लागते.

# यापूर्वी दाखल झालेल्या गुन्ह्याबाबतच्या माहितीसाठी सुरेश धस यांचे घोषणापत्र

**आष्टी । प्रतिनिधी**

**माजी मंत्री आणि सध्या महायुतीचे आष्टी येथील उमेदवार असलेले सुरेश धस यांनी त्यांच्यावर यापूर्वी दाखल झालेल्या गुन्ह्याबाबतची माहिती जनतेला देण्यासाठी एक घोषणापत्र प्रसिद्ध केले असून, त्या पत्रानुसार सुरेश धस यांच्यावर एकही गुन्हा सिद्ध होत नसल्याचे स्पष्ट होत आहे.**

आष्टी मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार माजी मंत्री सुरेश धस त्यांच्यावर वेगवेगळ्या स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. विरोधकांकडून या अनुषंगाने आरोप करण्यात येत आहेत. त्या आरोपाला प्रतिउत्तर देण्यासाठी आणि दाखल गुन्ह्याची स्थिती जनतेला माहित व्हावी यासाठी सुरेश धस यांनी घोषणापत्र प्रसिद्ध केले आहे. घोषणा पत्रानुसार सुरेश धस यांच्यावर एकूण ७ गुन्हे दाखल असून, त्यातील ५ प्रकरणे ही पाटोदा, आष्टी, शिरूर आणि बीड या न्यायालयात सुरू असून ते प्रलंबित आहेत. दोन गुन्ह्याच्या बाबतीत सुनावणी पूर्ण झाली असून, कोणतीही शिक्षा न होता यातून त्यांची मुक्तता झालेली आहे. जनतेला खरी परिस्थिती माहिती व्हावी यासाठी सुरेश धस यांनी हे घोषणापत्र प्रसिद्ध केले असून आता यामुळे विरोधकांना आरोप करता येणार नाहीत.

# अतिप्रमाणात स्क्रीन टाईम वाढणे ठरत आहे मुलांसाठी त्रासदायक-डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**जास्त 'स्क्रीन टाइम' मुलांच्या हृदयावर आणि मनावर परिणाम करत आहे.तसेच 'स्क्रीन टाइम' वाढणे हे मुलांसाठी त्रासदासक ठरु शकते. याचा मेंदूवरच परिणाम होत नाही तर मुलांच्या वागणुकीवरही परिणाम होतो, असे अभ्यासात समोर आले आहे.**

जागतिक 'मानसिक आरोग्य दिना' निमित्त प्रसिध्द झालेल्या अभ्यासात काही धोके स्पष्ट करण्यात आले आहेत. मुले रागीट आणि चिडचिडी होत आहेत. त्यांच्यात आक्रमकता, नैराश्य आणि चिंता विकार यासारख्या वर्तणुकीच्या समस्या अलीकडच्या काळात लक्षणीय वाढल्या आहेत. या वर्तणुकीशी संबंधित समस्यांमध्ये अचानक मूड बदलणे आणि मुलांच्या भावनामध्ये तीव्र बदल यांचा समावेश होतो. आक्रमकता वाढली तर विनाकारण चिडचिड आणि राग येऊ लागतो. अशा मुलांना मूड बदलणे, डोकेदुखी किंवा शरीर दुखणे, आवेग, अतिक्रियाशीलता आणि निष्काळजीपणा अनुभवण्याची शक्यता असते, या लक्षणांमध्ये



खराब शैक्षणिक कामगिरीचा समावेश आहे. खाण्यापिण्याच्या किंवा झोपण्याच्या पध्दतीमध्ये बदल, जसे की भूक न लागणे किंवा झोप न लागणे हे देखील अंतर्गत समस्यांचे लक्षण असू शकते. याशिवाय काही मुले अंथरुन ओले करतात किंवा अंगठा चोखणे इत्यादी प्रतिगामी वर्तन देखील दर्शवू शकतात हे संकटाचे लक्षण असू शकते. पालकांनी संयम बाळगावा. त्यांना मारु नये, ओरडणे किंवा अपमानास्पद पध्दतीने बोलणे टाळावे असा सल्ला अभ्यासकांनी दिला आहे.मुलांशी बोलताना त्यांना काय त्रास होत आहे, हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे त्यानंतर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा ग्रामीण भागात देखील हि समस्या उद्भवत आहे असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

# अपक्ष उमेदवार सुरेशकुमार जेथलीया यांना आदिवासी समाजाचा पाठिंबा



**परतूर । प्रतिनिधी**

मतदार संघातील अपक्ष उमेदवार श्री सुरेशकुमार जेथलीया यांना आज मतदारसंघातील सर्व आदिवासी समाजाने होणाऱ्या विधानसभेसाठी एकमुखाने जाहीर पाठिंबा दिला इथून पुढे येणाऱ्या काळामध्ये सर्व आदिवासी समाज सुरेशकुमार जेथलीया साहेब यांच्या पाठीशी आहे असे आश्वासन सर्व समाज बांधवांनी सुरेशकुमार जेथलिया यांना दिले सुरेशकुमार जेथलिया यांच्या संपर्क कार्यालयाच्या ठिकाणी समाज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते त्या ठिकाणी आदिवासी समाजातील पुरुष महिला व तरुण सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते प्राथमिक स्वरूपात समाजातील काही समाज बांधवांनी मनोगत व्यक्त केले काँग्रेस पक्षाने जरी तुमच्यावर अन्याय केला असेल तरीसुद्धा आदिवासी समाज सुरेशकुमार जेथलिया यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील हेच सर्वांनी मनोगत आधारे व्यक्त झाले.

आदिवासी समाज बांधवांचा झालेल्या मेळाव्यात महिलांची संख्या सुद्धा लक्षणीय होती या कार्यक्रमाच्या ठिकाणी सुरेशकुमार जेथलिया यांनी आदिवासी महिला भगिनींसोबत भाऊबीज साजरी केली मेळाव्यास सुरेशकुमार जेथलीया साहेब यांनी मार्गदर्शन केले व आपणही आदिवासी समाजाच्या प्रत्येक अडीअडचणीत त्यांच्या सोबत उभा राहून त्यांचे प्रश्न मार्गी लावेल असे आश्वासित केली. कार्यक्रमाच्या ठिकाणी विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्या ठिकाणी युवानेते नितीन भैया जेथलीया यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच अण्णासाहेब खंदारे, बाबासाहेब गाडगे ,माऊली वायाळ ,लक्ष्मण शिंदे ,अविनाश शहाणे ,तारीख सिद्दिकी ,बाबुराव हिवाळे, सुहास राठोड ,मोहसीन कुरेशी, विठ्ठल खरात , मंजूळदास सोळंके, माऊली देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मेळावा पार पडला. या मेळाव्यासाठी जालिंदर भाऊ चव्हाण, रामेश्वर लुपटे, रतन डवरे अमोल दुबळकर ,गजानन पारधी साईनाथ बोंडे, विठ्ठल धदाटे सोपान धडाटे ,उषाताई शिंदे गंगुबाई काळे ,खंडूजी बोंडे लक्ष्मी आई ,यशवंत चव्हाण ,संतोष चव्हाण ,सुनील काळे ,संजय चव्हाण ,अशोक पवार व आदिवासी समाजातील इतर प्रतिष्ठित नागरिक महिला पुरुष व तरुण मंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



# शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करून शेतकरी सन्मान योजनेतून वर्षाला १५ हजार देणार - आ.लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी**

**प्रत्येकास अन्न आणि निवारा प्रत्येक गरिबाला अन्न आणि निवारा देण्याचे महायुती चे असून वचन वृद्ध पेन्शनधारकांना महिन्याला १५०० वरून २१०० देणार असून जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर होतील २५ लाख रोजगारनिर्मिती करून १० लाख विद्यार्थ्यांनादरमहा १०,००० रुपये विद्यावेतन महायुती सरकार देईल. या बरोबर च ४५,००० गावांत पांदण रस्ते बाधणार या सह अंगणवाडी आणि आशा सेविकांना महिन्याला १५,००० वेतन आणि विमा संरक्षण देणार असल्याचे प्रतिपादन देणार असल्याच प्रतिपादन परतूर विधानसभा मतदार संघाचे महायुती चे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.**

परतूर तालुक्यातील आनंदवाडी, खांडवीवाडी, श्रीष्टी, दैठणा, सिंगोना, श्रीष्टी वाहेगाव, माव, पाटोदा, येनोरा, हातडी, सोयंजना, वलखेड, बामणी आणी शेरवाडा या चौदा गावात महायुतीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मतदार संवाद दौरा केला याप्रसंगी गावागावात आयोजित बैठकीत मार्गदर्शन करत असताना ते बोलत होते. परतुर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रचारार्थ आयोजित जनसंवाद बैठकीदरम्यान दौऱ्यात शत्रूघन कणसे, रमेश भापकर, संपत टकले, बद्रीभाऊ ढवळे, अशोकराव बरकूले, अंकुशराव बोबडे, संभाजी वारे, गजानन लोणीकर, रवी सोळंके, माजी सभापती वाघमारे शिवाजी पाईकराव यांची उपस्थिती होती. या वेळी पुढे बोलतांना बबनराव लोणीकर म्हणाले की परतूर मतदारसंघातील तीनशे गावांना डांबरीकरणाचे रस्ते प्रत्येक गावात सिमेंट काँक्रिटीकरण चे रस्ते गावोगाव सांस्कृतिक सभागृह अनेक प्रशासकीय इमारती मागासवर्गीय मुलींसाठी परतुर व मंठा येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मुलींचे वस्तीगृह न्यायालयीन इमारती परतुर मंठा येथे भव्य क्रीडा संकुल यासह शेगाव पंढरपूर दिंडी मार्ग आरोग्याच्या सुविधा उपलब्ध हव्यात यासाठी परतुर व मंठा या दोन्ही ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय अनेक ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र ३३ केव्ही १३२ केव्ही २२० केव्ही परतुर विधानसभा मतदारसंघात रस्त्याचा आणि विजेचे जाळ आपण निर्माण केलं असल्याचं यावेळी आमदार लोणीकर यांनी आवर्जून नमूद केलं. परतूर तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी रु), वाटूर, आष्टी, श्रीष्टी व सातोना येथे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (२४ कोटी ८८ लाख) असा एकूण ८४ कोटी ८८ लक्ष रु निधी तर मंठा तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी), दहिफळ खंदारे व ढोकसाळ या दोन प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (१२ कोटी ४४ लक्ष), तर खोराड सावंगी व उस्वद प्राथमिक आरोग्य उपकेंद्रसाठी (१ कोटी १० लाख) असे एकूण ७३ कोटी ५४ लक्ष रु निधी. मतदारसंघात २ उपजिल्हा रुग्णालयासाठी १२० कोटी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ३७ कोटी ३२ लाख तर २ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी १ कोटी १० लाख रुपये असा एकूण १५७ कोटी ४२ लक्ष रुपयांचा निधी आणला असल्याची माहिती दिली.

**प्रपत्र सी -१**

**फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र**

उमेदवाराचे नाव : **सुरेश रामचंद्र धस**, मु.पो. जामगांव, ता.आष्टी जि.बीड

राजकीय पक्षाचे नाव : **भारतीय जनता पार्टी**

निवडणुकीचे नाव : **विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४**

मतदारसंघाचे नाव : **२३१ - आष्टी विधानसभा मतदारसंघ**

मी **सुरेश रामचंद्र धस** वर नमुद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असुन, माझ्या फौजदारी पूर्व चरित्राबद्दल पुढील तपशिल जनतेच्या माहितीसाठी घोषीत करीत आहे.

| अ. क्र. | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्र. व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थिती | संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) आणि अपराधांचे (अपराधांचे) थोडक्यात वर्णन |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी पाटोदा, ता.पाटोदा जि.बीड | S.C.C. No. – 203/2022, Date 26.09.2022 Cr. No. 207/2020 | प्रलंबित | 188, 269, 270 I.P.C. Sec 51(B) of DM Act 2005 |
| २ | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी आष्टी, ता.आष्टी जि.बीड | R.C.C. No. – 141/2022 Date 11.07.2022 Cr.No. 224/2021 | प्रलंबित | 143, 147, 148, 149, 427, 448, 504, 506 I.P.C. |
| ३ | मुख्य न्याय दंडाधिकारी बीड, ता.जि.बीड | S.C.C. No. – 104/2022, Date 21.01.2022 Cr.No. 117/2021 | प्रलंबित | 188, 269, 270 I.P.C., D.M.A. 51(B), EP.D. ACT 2, 3, 4, |
| ४ | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी शिरुर कासार, ता.शिरुर कासार जि.बीड | S.C.C. No. – 12/2021, Date 12.01.2021 Cr.No. 161/2020 | प्रलंबित | 188, 269, 270 I.P.C. Sec 51(B) of DM Act 2005 |
| ५ | पोलीस स्टेशन आष्टी जि.बीड | FIR No. 386/22 Date 29.11.2022 | प्रलंबित | Sec. 13(1)(A)(B), 13(2) of Pre. of corruption Act 1988 Sec. 420, 465, 467, 468, 471, 120(B) 109 of I.P.C |

| (ब) फौजदारी अपराधांसाठी दोषसिध्द ठरविलेल्या प्रकरणांचा तपशिल | | | जास्तीत जास्त ठोठावलेली शिक्षा |
|---|---|---|---|
| अ.क्र. | न्यायालयाचे नाव व आदेशाचा (आदेशाचे) दिनांक | अपराधाचे (अपराधांचे) वर्णन व ठोठावलेली शिक्षा | |
| १ | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| २ | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

**आपला**

**सुरेश रामचंद्र धस**

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांची कर्जमुक्तीची आम्ही

तसेच आपण राज्यात मुलींप्रमाणेच मुलांना देखील मोफत शिक्षण देणार असल्याचे, उद्धव ठाकरे यांनी यावेळी सांगितले.

-------------

### विकासात आणि सुख-दुःखात मी वाटेकरी,

प्रदीप भैय्या पाटील, गणेश राव जाधव, दत्ताभाऊ गंगणे, उस्मान साहेब शेख, बालासाहेब गंगणे, शरद पाटील, अजितदादा गरड, मेघराज सोमवंशी, मनोज गंगणे, सुभाष बनसोडे, दगडू बनसोडे, विलास पाटील, हनुमंत आप्पा कोळगिरे, सुधाकर काळुंखे, रघुनाथ जोगदंड, हनुमंत गायकवाड, सतीश गंगणे, रावसाहेब आडे, राजाभाऊ लोमटे, गणेश देशमुख, विठ्ठल जाधव, सचिन बनसोडे, वजीर पठाण, कादर खान पठाण, महबूब शेख, प्रभाकर गंगणे, अख्तर जहागीरदार, हाजी शेख, संदिपान कांबळे, काशिनाथ वाघमारे, अमर कोळगिरे, सिद्धेश्वर कोळगिरे, त्याचबरोबर मुढेगाव येथे लक्ष्मण बापू जगताप, विलास जगताप, प्रवीण जगताप, बाळू तात्या जगताप, राडी तांडा येथे रावसाहेब आडे यांच्यासह काशिनाथ आडे, काशिनाथ राठोड, तसेच सायंकाळच्या सत्रात धानोरा बुद्रुक येथे आबासाहेब पांडे, मेघराज सोमवंशी, विश्वास पाटील, तुषार फुलाने, प्रशांत चिवडे, सुधाकर काळुंखे, विनोद भारती, बिबीशन चिवडे, श्रीकांत सोमवंशी, नवनाथ हातांगळे, नवनाथ काळुंके, रामराव मुळे, तडोळा येथे वसंतराव कदम, बिभीषण कदम, एकनाथ कातळे, अकोला येथे सुदाम आगळे, श्रीनिवास आगळे, वसंतराव आगळे, भारत आगळे, भारत बरकते, गुणवंत आगळे, राखी अंधारे, सुदाम आगळे, यांसह गावागावातील महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------

### काँग्रेसचा बंडखोरांना दणका,

महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात लढणाऱ्या सर्व बंडखोरांना निलंबित करण्यात आले आहे.'' दरम्यान, महाविकास आघाडीचा जाहीरनामा १० नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध होईल, असे सांगत काँग्रेसचे प्रमुख मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, पक्षाच्या सरचिटणीस प्रियांका गांधी वड्रा, पक्षातील वरिष्ठ नेते आणि कर्नाटक आणि तेलंगणाचे मुख्यमंत्री महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक प्रचारात सहभागी होणार आहेत. १३ नोव्हेंबरपासून पाच दिवस काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे महाराष्ट्रात असतील. तर राहुल गांधी हे १२, १४ आणि १६ नोव्हेंबर रोजी प्रचार सभा घेणार आहेत. प्रियांका गांधी १३,१६ आणि १७ नोव्हेंबरला राज्यात प्रचारात सहभागी होणार असल्याचेही रमेश चेन्निथला यांनी सांगितले.

-------------

### अनिलदादांनी फोडला

चरणी प्रचाराचा नारळ फोडला आणि आपल्या प्रचाराचा शुभारंभ केला. यानंतर बीड मतदार संघातील राजुरी सर्कल, लिंबागणेश सर्कल, पाली सर्कल, खोकरमोहा जि प, नळावंडी सर्कलमधील गावागावातील देवस्थानाचे दर्शन घेतले. दरम्यान गावाखेड्यातील प्रत्येकाने अनिलदादा आणि सुरेश नवले यांचे गावात आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी करत अनिलदादांना पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले तर माता-माऊली आणि भगिनींनी अनिलदादा यांचे औक्षण करून त्यांना पुढील वाटचालीसाठी आशीर्वाद दिले. यानंतर अनिलदादांनी गौरक्षनाथ टेकडी या देवस्थानी नतमस्तक होऊन महंत नवनाथ महाराजांचा आशीर्वाद घेतला. त्यानंतर बीड शहरातील भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर, बस्वेश्वर स्वामी, संत गाडगे बाबा महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, अहिल्यादेवी होळकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, महाराणा प्रताप, माता जिजाऊ यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन केले. याप्रसंगी अनिलदादा जगताप आणि प्रा सुरेशजी नवले यांनी ठिकठिकाणी उपस्थित असलेल्या आपल्या समर्थक कार्यकर्त्यांच्या, ग्रामस्थांच्या भेटी घेतल्या व विधानसभा निवडणुकीत आम्हाला मतदान रुपी आशीर्वाद द्या असे आवाहन केले.

**क्षीरसागर मुक्त बीड करून विकासाचा कायापालट करण्यासाठी साथ द्या-अनिलदादा जगताप**

अनेक वर्ष सत्ता भोगून बीड विकासाचा खेळखंडोबा करणाऱ्या क्षीरसागरांपासून मला बीडची सुटका करायची आहे आणि बीड विकासाचा कायापालट करायचा आहे. यासाठी माझ्यावर एकदा विश्वास ठेऊन मला साथ द्या. आपल्या अपेक्षेप्रमाणे मी बीडचा विकास करून दाखवेल. आपण मला मतदानरुपी आशीर्वाद दिला तर घरणेशाहीचे मक्तेदारी संपुष्टात येईल आणि सामान्य घरात सत्ता स्थापित होऊन सामान्यांचे मूलभूत प्रश्न सुटतील. असे आवाहन बीड विधानसभेचे अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांनी बीड मतदार संघातील जनतेला केले.

-----------

### विधानसभेनंतर शिक्षण,

आहे त्यांना डोळे झाकून मतदान करा, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे की, जरांगे पाटील यांनी शरद पवार यांची जी घोषणा आहे की, २०० आमदार विधानसभेत असतील. यांच्या अंमलबजावणीला सुरुवात केली आहे. पहिल्यांदा उमेदवारी अर्ज भरा असे म्हणून सर्वांना अर्ज भरायला लावले. निजामी मराठ्यांच्या बैठका झाल्या. निजामी मराठ्यांनी काही ठिकाणी गरीब मराठा आणि काही ठिकाणी ओबीसी उमेदवार उभे करून घेतले आणि इतर ठिकाणी मराठा विरूध्द मराठा असे चित्र उभे करण्यात आले आहे. या बैठकांमध्ये मराठा आमदार कसे निवडून येतील याचीच रचना आखण्यात आली. या खेळात भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे एकत्र आहेत हे ओबीसींनी पहिले लक्षात घ्यावे. हे लक्षात घेतले नाही, तर आपण हुकणार हे लक्षात घ्या अशी शक्यताही यावेळी त्यांनी व्यक्त केली. पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, त्यांचा निर्णय झाला आहे की, मराठ्यांनी मराठ्यांनाच मतदान दिले पाहिजे. आता ओबीसींनी आरक्षण वाचवण्यासाठी मत हे एससी, एसटी, ओबीसी आणि वंचित बहुजन आघाडीच्या मुस्लीम उमेदवारांनाच दिले पाहिजेत अशी भूमिका घेतली पाहिजे. ही भूमिका जर बजावली तरच ओबीसींचे उमेदवार निवडून येतील असेही ते म्हणाले.

--------

### विकासासाठी खेचून आणलेल्या निधीचा

प्रचारार्थ अपक्ष उमेदवार आ.लक्ष्मण पवार यांनी पिंपळनेर येथे कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन केले होते. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी गंगाधर घुमरे, सतिष पाटील, सुंदर चव्हाण, दुष्यंत डोगरे, मनोज पाटील, विठ्ठल शिदे, जितु बोबडे, राधाकिसन पेंढारे, गव्हाणे सर, भागवत पवळ, भागवत दुबाले,बंडु दुबाले, यांच्यासह आदींची उपस्थिती होती. गेवराई मतदारसंघातील पाडळशिंगी ते लोखंडी सावरगाव, चकलांबा ते पांढरवाडी- गेवराई, बागपिंपळगाव -तलवाडा-राजेगाव, तर नव्याने सुरू झालेला जातेगाव - गेवराई, रेवकी-देवकी, अशा अनेक मोठ्या रस्त्यासाठी मी प्रमाणिक प्रयत्न करीत हाजारो कोटी निधी खेचून आणलेला आहे. हे सगळे रस्ते दर्जेदार करुन घेण्यासाठीच तसेच भविष्यातही आणखी खूप काम करायचे आहे. येणाऱ्या काळात मोठ्या प्रमाणावर सिंचनाची कामे करायची आहेत. यातून तालुक्यातील शेतकरी सदन झाला पाहिजे हेच आपले स्वप्न असल्याचे त्यांनी सांगितले. म्हणून यासाठी आपण येत्या २० तारखेला १५ क्रमांकाचे ऑटोरिक्षा या चिन्हसमोरील बटन दाबून मला प्रचंड बहुमताने विजयी करा असे आवाहन आ.लक्ष्मण पवार यांनी मतदारांना केले. या मेळाव्याला पिंपळनेर परिसरातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदार बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शौयब आत्तार प्रमेश्वर दुबाले,ज्ञानेश्वर शिदे,कानीफ वीर,लहु गायकवाड, आसाराम थोटे,नवनाथ डावकर,अशोक फुणे,रामप्रसाद थोटे ,चंदु मोरे,दादाशिव नागरगोजे, गोरख मुंडे, अंनता नागरगोजे,नाना गव्हाणे,रामनाथ आंदुरे,लक्ष्मण पैठणे,रुस्तुम नांदे,बाळासाहेब आवारे,दत्ता किवणे,महेश कदम,दत्ता मोरे,सतिष हाटोटे,अंगद देवकर, रमेश गाडे,समीर बेग,मनोज गुंड,अशोक घोलप,गव्हाणे सर,सलीम शेख,रसुलभाई,जमील भाई,बाबा आरे,निवृत्ती मते,प्रितम वाघमारे,माने सरपंच, गोरख शिदे,लांडे महाराज, रवि आर्सुळ,अमोल तागंडे,अतुल कवचट,सतिष शिदे,प्रकाश मते, आदीनी परिश्रम घेतले आहेत

-----------

### सत्ता आल्यास मशिदीवर

यांनी केलं. सत्तेत नसताना आम्ही अनेक विषय मार्गी लावल्याचे राज ठाकरे म्हणाले. पुढच्या दोन दिवसात पक्षाचा जाहीरनामा येणार आहे. त्यामध्ये एक गोष्ट म्हणजे आमची सत्ता आल्यास राज्यातील एकाही मशिदीवर भोंगा ठेवणार नाही असे राज ठाकरे म्हणाले. रस्ते अडवून पाडले जाणारे नमाज बंद करणार असल्याचे राज ठाकरे म्हणाले.

उद्धव ठाकरेंचं सरकार असताना आम्ही मशिदीवरील भोंगे आम्ही बंद केले. यावेळी १७००० महाराष्ट्र सैनिकांवर गुन्हे दाखल झाल्याचे राज ठाकरे म्हणाले. महाराष्ट्रात मशिदीवरील भोंगे उतरवले नाहीतर आम्ही सांगितलं होतं, की त्यापुढे हनुमान चालीसा लावू असे राज ठाकरे म्हणाले. पुण्यात एका मुस्लिम पत्रकाराने सांगितले की, तुम्ही घेतलेला निर्णय योग्य आहे. मशिदीवर भोंगे काढण्याचा तुमचा निर्णय योग्य असल्याचे त्या पत्रकाराने सांगितल्याचे राज ठाकरे म्हणाले.

-----------

### विकासाचा बॅकलॉग भरून

त्यांचे प्रश्न, समस्या जाणून घेतल्या. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर गावातील नागरिकांशी संवाद साधताना म्हणाले की, लोकांच्या मागण्या पूर्ण करू. सर्व समजातील घटकाला सोबत घेऊन विकासकामे करायचे आहेत. मागील पाच वर्षात कामे झाली नाहीत, ते सर्व कामे येणाऱ्या पाच वर्षात पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. भ्रष्टाचार रोखण्यासाठी प्रयत्न करणार आहे. बीड शहराप्रमाणे ग्रामीण भागात देखील दर्जेदार कामे करायची आहेत. आपल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नसल्याचे देखील डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले.

**आमदार पुन्हा गावात आलेच नाहीत!**

आमदार संदीप क्षीरसागर हे निवडून आल्यानंतर आमच्या गावात आलेच नाहीत, त्यांनी पुन्हा तोंड दाखविले नाही. दिलेली आश्वासने पाळली नाहीत. त्यामुळे आता त्यांना गावात आल्यास जाब विचारणार असल्याच्या संतप्त भावना अनेक गावातील ग्रामस्थांनी व्यक्त केल्या. दरम्यान, शिरूर कासार तालुक्यातील जनतेवर अशा प्रकारे आपल्याकडून कधीही अन्याय होणार नाही, असा विश्वास डॉ.योगेश क्षीरसागर यांनी ग्रामस्थांना दिला.

**काँग्रेसच्या पदाधिकाऱ्याचा जाहीर प्रवेश**

रायमोह परिसरातील तागडगावचे काँग्रेस नेते विलास बबन ढाकणे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश झाला. त्यांच्यासह इतर सहकाऱ्यांचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी स्वागत केले.

-------------

### माजलगावात रमेश आडसकरांची

पलिकडे जावून अशोक आबांनी सर्वांशी संबंध प्रस्थापित केलेले आहेत. माजलगावच्या राजकारणातील बडे प्रस्थ म्हणून अशोक डकांचा उल्लेख केला जातो.त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून शेवटच्या दिवशी माघार घेतली होती. त्यानंतर आता अशोक डक काय निर्णय घेतात ? याकडे मतदार संघाचे लक्ष लागले होते.अखेर दि ०७ नोव्हेंबर गुरुवार रोजी अशोक डक यांनी वाऱ्याचा अंदाज ओळखून रमेश आडसकरांना साथ देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे रमेश आडसकरांना मोठी ताकद मिळाली असुन आता आडसकर-डक यांचे समिकरण प्रकाश सोळंकेसह मोहन जगताप यांना हाबाडा देईल असा विश्वास कार्यकर्ते व्यक्त करू लागले आहेत.

---------

### आरोपी अन् पीडिता यांच्यात तडजोड झाली तरी

उच्च न्यायालयाचा आदेश रद्द केला. एफआयआर आणि फौजदारी कारवाई कायद्यानुसार चालविली जाईल, असे कोर्टाने म्हटले आहे.

--------

## प्रमाणपत्र हरवले आहे

प्रमाणीत करण्यात येते की, अर्जदार नामे किसन सखाराम कोळेकर वय ५५ वर्षे रा.शिंगावाडी ता.शिरुर का जि.बीड हे शिंगारवाडी ते तिंतरवणी असा खाजगी वाहनाने प्रवास करीत असतांना त्यांचे कडील असलेले त्यांचे मालकीचे जॉनडिअर कंपनिचे ट्रॅक्टर ज्याचा पासींग क्रमांक MH-२३-T- २५४४ या ट्रॅक्टरचे आर सी बुक प्रवासा दरम्यान कोठेतरी हरवले बाबतचा अर्ज दिला. आहे. सदरचा अर्ज घेवुन पुढील चौकशी करीत आहोत.

करीता सदरचे प्रमाणपत्र देण्यात येते.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. ०८ नोव्हेंबर २०२४



## निवडणूकीच्या धामधुमीत शेतकरी दुहेरी संकटात; कापूस, सोयाबीन खरेदी केंद्र बंद, बळीराजाला निवडणुकीचा फटका

किल्ले धारूर /प्रतिनिधी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने व्यापाऱ्यांना रोख रक्कम घेऊन जाताना तपासणीचा ससे मिरा पार करावा लागतो हे टाळण्यासाठी अनेक व्यापाऱ्यांनी कापूस खरेदी बंद ठेवली आहे तर शासकीय सोयाबीन खरेदी केंद्रही सुरू झाले नाही आहे. तसेच शासकीय कापूस खरेदीकेंद्र मंजूर च नाही त्यामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.

विधानसभा निवडणुकीमध्ये मोठ्या प्रमाणावर काळा पैसा निवडणूक खर्चासाठी वापरला जातो यावर प्रतिबंध घालण्यासाठी निवडणूक विभागाकडून जागोजागी तपासणी पथके नियुक्त केली आहेत.ग्रामीण भागात कापूस खरेदीसाठी मोठी कॅश रक्कम लागते ,तपासणी पथकास अशी रक्कम आढळल्यास व्यापाऱ्यांनात् विविध अडचणींचा सामना करावा लागतो कापसाला हमीभाव मध्यम दर्जाचा ७१०२१ रू उच्च दर्जाचा कापूस ७५२१ रुपये असताना प्रत्यक्षात ७००० दराने कापूस खरेदी केला जातो शासकीय खरेदी केंद्र सुरू नसल्याने व निवडणुकांमुळे खाजगी व्यापाऱ्यांनी कापूस खरेदी बंद केल्यामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. कापूस व सोयाबीन शासकीय खरेदी सुरू करण्याची शेतकरी करत आहेत.शासकीय कापूस खरेदी केंद्र मंजूर नाही धारूर बाजार समितीच्या अंतर्गत गुरु राघवेंद्र, बालाजी फकीर जवळा,नर्मदा जिनिंग , व विश्र्वतेज खोडस , ठिकाणी कापूस खरेदी सुरू आहे तर नर्मदा जिनिंग वर कापूस खरेदी बंद आहे.सोयाबीन खरेदी चे अधिकार खरेदीविक्री संघाकडे आहेत. -दत्तात्रय सोळंके सचिव बाजार समिती धारूर

# मरणाचे स्मरण व देवाचे स्मरण असले की जीवन सुखकर,आनंदी होते -श्रीनाथ गोसावी महाराज

**आष्टी । प्रतिनिधी**

मरणाचे स्मरण व देवाचे स्मरण असले की जीवन सुखकर आनंदी होते.कोंडीबा रेडेकर हे सामाजिक व धार्मिक क्षेत्रात कार्यरत होते. त्यांनी अनेक दिंड्यानां अन्नदान केलेले आहे.एक धाडशी व करारी व्यक्तीमत्व म्हणून त्यांची ओळख होती.त्यांनी रा.स्व.संघाचे सक्रीय काम केले गोहत्या रोखण्यासाठी प्रचंड काम केले एक शिस्त प्रीय व्यक्ती म्हणून त्यांची सर्वत्र. ओळख असे कृषी विभागात नौकरी करताना कृषी विभागात विविध नवनवीन शेतीत प्रयोग केले. जास्तीचा सेंद्रिय शेती करण्यावर भर दिला. आपल्या वाट्याला आलेले आनंदाने काम करावे.रेडेकर बापुंनी आपल्या वाट्याला आलेले काम आनंदाने केले.देव,देश व धर्मासाठी कोंडीबा रेडेकर बापु जगले असे संत एकनाथ महाराज यांचे १४ वे. वंशज ह.भ.प.श्रीनाथ महाराज गोसावी यांनी केले.

आष्टी येथील सेवानिवृत्त कृषी अधिकारी कै.कोंडीबा जयंतराव रेडेकर यांच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ आयोजित



कीर्तनात ते बोलत होते.ह.भ.प.गोसावी महाराज म्हणाले की,प्रखर हिंदुत्वावादी, उत्कृष्ट नियोजन करणारे व्यक्तीमत्व,हाडाचा शेतकरी होते. गोमाता,तुळस, धर्माबद्दल खुप आदर प्रेम होते.कडवे धर्मवेडे, डोळस श्रध्दावान होते.कारसेवेत बापुला बरोबर घेऊन गेलो नव्हतो... ते रागावलेही होते. यावेळी देवीदास धस,ड.चंद्रकांत आजबे,श्रीधरपंत सहस्त्रबुद्धे, माजी सभापती नियामत बेग,दिनकरराव तांदळे महाराज,वाल्मिक तात्या निकाळजे,विठ्ठलराव बन्सोडे, नामदेव राऊत, चेअरमन आदिनाथ सानप, सुखलाल मुथा,ड. बाबुराव अनारसे,विजय गोल्हार, डा.शिवाजी राऊत,श्रीहरि पुरी महाराज,गोविंद पवार महाराज, डा.मधुकर हंबर्डे,बलभीम सुंबरे, नगरसेवक सुरेश वारंगुळे,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,बाळकृष्ण राऊत,नानासाहेब तवले,रविंद्र तवले,तुकाराम भोसले,लाला महाराज राक्षे,नगरसेवक पप्पु गर्जे, भीमराव गायकवाड महाराज, बलभीमबापु खाडे, नगरसेवक किशोर झरेकर,खंडुदादा जाधव, शिवदास केरुळकर,मोहन झांबरे, पिराजी तवले आदि सामाजिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी वाल्मिक तात्या निकाळजे म्हणाले की कोंडीबा रेडेकर यांचे बंधु विठ्ठलराव रेडेकर गुरूजी हे देखील फार परखड व्यक्ती होते करारी बाणा कडक वकृत्वावर त्यांचा पगडा होता. ते नक्कीच या मतदार संघाचे लोकप्रतिनिधी झाले असते. मात्र नियतीने त्यांना दीर्घ आयुष्य दीले नाही ते बीड जिल्हा परीषदेचे सलग तीन पंचवार्षिक सदस्य होते. यावेळी ह.भ.प.कडु भाऊ महाराज,ह.भ.प.दिनकरराव तांदळे महाराज,कैलास महाराज रंधे, श्रीहरि पुरी महाराज,आजबे महाराज,श्रीधरपंत सहस्त्रबुद्धे, भीमराव गायकवाड,डा.मधुकर हंबर्डे,ड.बाबुराव अनारसे, बलभीम सुंबरे,सुखलाल मुथा,ड. वाल्मिकतात्या निकाळजे,प्राचार्य डा.सोपान निंबोरे,माजी सभापती नियामत बेग,चेअरमन आदिनाथ सानप,समाजसेवक विजय गोल्हार,डा.शिवाजी राऊत,ड. चंद्रकात आजबे,देवीदास आजबे यांनी श्रध्दांजली अर्पण केली.

# लिंबाच्या झाडाला बांधलेल्या झोक्याचा फास बसून चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील पिंपळगाव (नाखले) शिवारातील शेतात लिंबाच्या झाडाला लहान बहिणीसाठी बांधलेल्या झोक्यात बसायला गेलेल्या चिमुकल्याचा झोळणीच्या झोक्याचा फास बसून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दि.०६ आक्टोंबर बुधवार रोजी पहाटे घडली.



परिसरातील पिंपळगाव (नाखले) येथील गणेश गोपीनाथ भगत यांचा मुलगा बाळराजे वय ०६ वर्षे दिंद्रुड येथील शाळेत पहिली च्या वर्गात शिकत होता. शाळेला दिवाळीच्या सुट्ट्या असल्याने तो आई, आजी व लहान बहिणी सोबत घरच्या शेतात दि.२९ आक्टोंबर मंगळवारी गेला होता. येथील शिवारातील गट क्र. १४६ मध्ये दोघी सास-सुना कापूस वेचणी साठी जाताना लिंबाच्या झाडाला साडेचार वर्षीय मुलीसाठी (सई) झोळणी बांधली होती. कापूस वेचणी करत असताना गणेश यांची मुलगी सई व मुलगा बाळराजे हे लिंबाच्या झाडाखाली खेळत होते. तिथे पिण्यासाठी आणलेल्या पाण्याच्या कॅंडवर चढून बाळराजे झोळणीत झोका खेळण्यासाठी चढला. मात्र झोळणीचा झोका उलटा झाल्याने त्याला फास बसला आणि तो बेशुद्ध पडला. त्याच्या लहान बहिणीने पाणी मागितल्यावर त्याने दिले नाही म्हणून तिने आईला हाक दिली. त्यावेळी घडला प्रकार उघडकीस आला.

माजलगाव येथील खाजगी रुग्णालयात बेशुद्ध चिमुकल्यास तातडीने हलवले. मात्र प्रकृती साथ देत नसल्याने पुढे संभाजीनगर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. आठ दिवसानंतर बुधवारी पहाटे त्याची प्राणज्योत मालवली. छोट्याशा बाळराजे चा दुर्दैवी मृत्यू झाल्याने गावासह परिसरात शोककळा पसरली होती. बुधवारी दुपारी चिमुकल्या बाळराजे वर दुःखद वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## वाढत्या सुट्ट्यामुळे भाविकांची गर्दी; मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर सतत होतोय खोळंबा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

महाराष्ट्रातील भाविकांचे श्रध्दास्थान व शक्तीपीठ असलेले योगेश्वरी देवी मंदिर हे भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असून देवीकडे जाण्याच्या सर्वच रस्त्यांमधून वारंवार ट्रॅफिक जाम होते प्रशस्त रस्त्यांची, कायम स्वरूपी उपाय योजनांची गरज आहे.

आणि ट्रॅफिक जाम झाल्यामुळे नागरिकांचा अक्षरशः श्वास कोंडला जातो.अंबाजोगाई शहरातील अनेक रस्त्यांचे रुंदीकरण झाले असून छत्रपती शिवाजी महाराज चौक ते योगेश्वरी देवी मंदिर रस्त्यावर मात्र वाढती अतिक्रमणे आणि अस्ताव्यस्त वाहने उभी असतात यामुळे वारंवार ट्रॅफिक जामच्या समस्येने अंबाजोगाईकर आणि



भाविक भक्त त्रस्त झाले आहेत हा विषय वेळोवेळी डोकेदुखीचा बनला असून अनेक वेळा तात्पुरत्या स्वरूपात याबाबत उपाययोजना केली जाते मात्र नंतर तीच समस्या वारंवार उदभवते पोलीस यंत्रणा गाफीलच असते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते गुरुवार पेठ योगेश्वरी देवी मंदिर कडे जाणाऱ्या या रस्त्यांवर चारचाकी वाहने, दुचाकी वाहने त्याचबरोबर फळ विक्रेते मधोमध उभारलेले असतात त्यामुळे ट्रॅफिक जामची समस्या वेळोवेळी निर्माण होते याकडे आता कोण लक्ष देणार हा खरा प्रश्न आहे सध्या दिवाळीनिमित्तच्या सुट्ट्यांमुळे राज्यभरातील भाविक हे देवी दर्शनासाठी अंबाजोगाई शहरात येतात रस्ते हे ट्रॅफिक जाम होतात आहे त्या परिस्थितीतून कसाबसा मार्ग निघतो आणि भाविक योगेश्वरी देवीचे दर्शन घेतात आणि निघून जातात प्रशासनाने वेळीच नियोजन करून उपाययोजना करणे गरजेचे आहे अशी मागणी जनतेमधून होत आहे.

# शिवचैतन्य जागरण यात्रेचे आज अंबाजोगाईत आगमन

### यात्रेनिमित्त प.पू.स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांचा संत संदेश प्रवचनाच्या कार्यक्रमाचे आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शिवचैतन्य जागरण यात्रेचे आज शुक्रवार, दिनांक ८ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता छत्रपती संभाजीराजे चौक, मोरेवाडी, अंबाजोगाई येथे आगमन होणार आहे. यात्रेनिमित्त प.पू.स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांचा संत संदेश प्रवचनाचा कार्यक्रम आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई येथे सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती आयोजक दासोपंत संशोधन मंडळ, अंबाजोगाई यांच्या वतीने देण्यात आली आहे.

शिवचैतन्य जागरण यात्रेनिमित्त प्रमुख मार्गदर्शक प.पू.स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज ( कोषाध्यक्ष,




श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास, अयोध्या उपाध्यक्ष, श्रीकृष्ण जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास, मथुरा) यांचा संत संदेश प्रवचनाचा कार्यक्रम आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई या ठिकाणी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

रामभक्त व भाविक बंधू - भगिनींना नम्र निवेदन :

सर्व रामभक्त व भाविक बंधू - भगिनींना नम्र निवेदन करण्यात येते की, श्रीराम जन्मभूमी न्यास कोषाध्यक्ष व मंदिर निर्मिती मधील प्रमुख संतांपैकी एक असे भागवत कथाकार, भगवान श्रीराम कथाकार पूजनीय संत.श्री.गोविंददेव गिरी (पू.श्री. किशोरजी व्यास) महाराजांचे आगमन शुक्रवार, दिनांक ८ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजता छत्रपती संभाजीराजे चौक, मोरेवाडी, अंबाजोगाई येथे होत आहे. त्यांच्या आगमनाप्रित्यर्थ व शिवचैतन्य यात्रानिमित्त छत्रपती संभाजीराजे चौक, मोरेवाडी येथून भव्य शोभायात्रा बाईक रॅली आयोजित केली आहे. या बाईक रॅली मध्ये प्रत्येक रामभक्तांनी सहकुंटूब सहपरिवार, पारंपारिक वेशात आपल्या बाईक / स्कूटीसह यावे. त्यानंतर आपल्या सर्वांना पू.श्री.गोविंददेवगिरी महाराजांच्या आशीर्वचनाचा लाभ मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात सकाळी १० वाजता मिळणार आहे. तरी सर्व रामभक्तानां व भाविक बंधू - भगिनींना विनंती आहे. की, आपण सर्वांनी जास्तीत - जास्त संख्येने उपस्थित राहावे. आणि सहकुटुंब सहभाग नोंदवावा असे आवाहन आयोजक, दासोपंत संशोधन मंडळ, अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

पान ६ वरून...

### सौ.गिताभाभी बाळराजे पवार यांचा

शहरात केलेल्या दर्जेदार कामा मुळेच ग्रामीण भागातील जनतेने आ.लक्ष्मण आण्णा पवार यांना विधानसभेला उभे रहावे असा आग्रह केला होता. त्याच मागणीनुसार गेवराई विधानसभा निवडणूक २०१४ ला गेवराई मतदारसंघातील जनतेने ६० हजार मताच्या फरकाने त्यांना निवडून दिले, यांची जाणीव ठेवुन आ.लक्ष्मण आण्णांनी प्रमाणिक प्रयत्न करुन मतदारसंघातील प्रत्येक गावा गावात दर्जेदार रस्ते केले आहेत यांची मतदारसंघातील जनता साक्षीदार आसून त्यांना दुसऱ्यांदा ही या मतदार मायबाप जनतेने सेवा करण्याची संधी दिली आन त्यांनी दहा वर्षात या तालुक्याचा कायापालट केला. म्हणून येणाऱ्या २० नोव्हेंबरला १५ क्रमांकाचे ऑटोरिक्षा या चिन्हा समोरील बटन दाबून मतदार आ.लक्ष्मण आण्णा पवार यांना पुन्हा या मतदार संघाची सेवा करण्यांची संधी देतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांच्या या झंझावाती प्रचाराने गेवराई शहरासह मतदार संघात आ.लक्ष्मण पवार यांची ऑटोरिक्षा सुसाट धावत असल्याचे दिसून येत आहे.

या प्रचार दौऱ्यात त्यांच्या समवेत आ.लक्ष्मण पवार यांच्या सुविद्य पत्नी भाग्यश्रीताई पवार, रत्नमालाताई मोटे, नगरसेवक राहुल खंडागळे, याहीया खॉन, दादासाहेब गिरी, ब्रम्हदेव धुरंधरे, आप्पासाहेब कानगुडे, राम पवार, संजय इंगळे, शिनुभाऊ बेद्रे, समाधान मस्के, रजीत खाजेकर, लक्ष्मण चव्हाण, महादेव बेद्रे, राणा कानाडे, पप्पु काबंळे, किशोर काडेकर, लहुराव सावंत, नितीन कांडे, किरण गायकवाड, मुरलीधर सुतार, सुदाम चव्हाण, विठ्ठल धापसे, माऊली सुतार, बाळराजे थोरात, नवनाथ धुरंधरे, अनिल धापसे, हारी पंडीत, इमरान शेख, सादेक चाचु, संतोष सुतार, भुषण जोगदंड, पिंटु साळवे, दिपक अवघड, शिवाजी काळे, शेख शब्बीर, शेख ईर्शाद, शौकत पठाण, दाऊद पठाण, योगेश मोटे, पप्पु बांडे, संकेत पौळे, प्रकाश बर्डे, पिंटु बर्डे, अमोल हादगुले, अनिल खांडेकर, राजेंद्र तापडीया, शेख बाबा, आदि उपस्थित होते.

### शिरूर पट्ट्यातील

क्षीरसागर बोलत होते. पुढे बोलताना डॉ. क्षीरसागर म्हणाले मागील पाच वर्षांमध्ये विद्यमान आमदाराला जनतेमध्ये जायला वेळ मिळत नव्हता. जनतेची प्रश्न ऐकून घेण्याची त्यांना कधी गरज ही वाटली नाही. परिणामी मतदार संघामध्ये विकास कामाला खिळ बसली आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये मतदारसंघ एकही सिंचनाचे काम होऊ शकले नाही. खरे तर स्वर्गीय काकूंचा या परिसरामध्ये कालवा उभारण्याचा मोठा प्रयत्न होता मात्र तो होऊ शकला नाही. तोच प्रश्न आपण पुनर्जीवित करणार शिरूर पट्ट्यातील गावांना विकास कामासाठी विशेष प्रधान्य देणार असल्याचे अभिवचन डॉ. योगेश क्षीरसागर यांनी दिले यावेळी माजी जिप. सदस्य मोहनराव ढाकणे,अर्जुन (बप्पा )खेडकर,साहेबराव जायभाये, हौसराव जायभाये ,वसंतराव सोनवणे,उमर शेख,बाबासाहेब जायभाये,कल्याणराव ढाकणे, नामदेव खेडकर,फारूक सय्यद, बाबुराव सोनवणे, अमोल सानप, महेश खेडकर, अनिस सय्यद आदिसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शानुर सय्यद यांनी केले.

पान ६ वरून...

### महायुतीच्या सर्व उमेदवारांना

योजना राबवल्या आहेत.विरोधक असलेल्या महविकास आघाडी ही भकास आघाडी आहे.विकास हा शब्द त्यांच्या पासून कोसो किलोमिटर दूर आहे.बीड जिल्ह्यात महायुती सरकार च्या काळात लोकनेत्या पंकजाताई मुंडे ह्या पालकमंत्री असताना जलयूक्त शिवार योजना, नॅशनल हाईवे, शेतकरी राजाला पीक विमा, आदी विकास कामे मोठ्या प्रमाणावर झाले आहेत.अश्याच प्रकारे राज्यात महायूती सरकार जनतेच्या सेवे करिता अहोरात्र मेहनत घेत आहेत.सर्व जाती धर्माच्या लोकांना एकत्र घेऊन,समाजातील सर्व घटकांना न्याय देण्याचे काम आपले सरकार करत आहे.महाविकास आघाडी सरकार फक्त फेक नेरीटिव्ह पसरविण्याचे काम करत आहे.राज्याच्या जनतेच्या प्रश्नांचे त्यांना काही देणेघेणे नाही.भारत देश देशाचे कणखर पंतप्रधान मा.नरेंद्र जी मोदी साहेब यांच्या नेतृत्वाखाली जगाच्या नकाशावर आपल्या भारत देशाची उंची वाढली आहे आणि अश्याच प्रकारे आपले राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा.एकनाथजी शिंदे साहेब उपमुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस साहेब,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब,भाजपा राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडे ही सर्व महायुतीची नेते मंडळी महायुती सरकार म्हणून राज्याला दिशा देण्याचे काम करत आहेत.त्यामुळे बीड जिल्ह्यातील जनतेला एक नम्र विनंती आहे महाराष्ट्र राज्य परत एकदा महायुती च्या माध्यमातून सुजलाम सुफलाम बनणार आहे त्यात आपले योगदान म्हणून जिल्ह्यातील सर्व मतदार बंधू भगिनी यांनी आपले एक अमूल्य मत देवून आपल्या सर्व महायुतीच्या उमेदवारांना विजयी करावे असे आवाहन भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा जिल्हा सरचिटणीस ड.सर्जेराव तात्या तांदळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

### मी आमदार नसताना

तसेच संतोषराव मोहिते, श्री. कपूर आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना श्री. अर्जुनराव खोतकर म्हणाले की, येथील गर्दी पाहून निश्चितच वाटते की, आपला विजय नक्कीच आहे. परंतू आपल्याला गाफील राहुन चालणार नाही, रात्र सुध्दा वैर्याची आहे. येणार्या वीस ताखरेला विधानसभेची निवडणूक पार पाडणार आहे. याच निवडणूकीसंदर्भात मी तुमच्याकडे आलेलो आहे. आपण सत्तेवर नसतांनाही आपण वाघुळच्या देवी मंदिर रस्त्यासाठी पंधरा लाख रुपये दिले, मुस्लीम वस्तीत जाणार्या रस्त्यासाठी दहा लाख रुपये दिले. त्याचबरोबर गणपती, सावता आणि महादेव मंदिरासाठी सुध्दा पंधरा लाख रुपये दिले आहेत. त्यामुळे धनुष्य बाणासमोरील बटण दाबून मला प्रचंड मतांनी विजयी कराल, यात शंका नाही. आपल्याकडे सत्ता नसतांनाही आपण एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी देऊ शकतो तर सत्ता हाती आल्यानंतर तर पाहयचेच काम नाही. गावातील शाळेचे बांधकाम केले, बाबासाहेब आंबेडकर यांच्या सभागृहासाठी दहा लाख रुपये दिले, असे असतांनाही तो आयत्या बिळावरील नागोबा म्हणतो, मी आणले, ते केले, प्रतंत तर काहीच काम केले नसते. असे सांगून ते म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी बीज बिल कजा;तून मुख्त केले आहे. केंद्राची नमो शेतकरी योजनेमध्ये शेतकर्यांना सहा हजार रुपये मिळत होते ते मुख्यमंथत्र्यंनी बारा हजार केले. मुख्यमंत्री म्हणून एकनाथराव शिंदे यांना त्या खुर्चीवर बसवण्यासाठी मला आमदार करणे गरजेचे आहे, त्याशिवाय दुसरा पर्याय नाही. कुंबेफळ (सिंदखेड) येथे बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की, कुंभेफळ गावातीलमडळीनी माझ्यावर खूप प्रेम केले आहे. आपल्या गावातील ओढे- नाले अरुंद होते, त्यावर बंधारे घतले. ते मी स्वत: रुंद करुन दिले. प त्यामुळे आपल्या गावचे पाणलोट क्षेत्र वाढले आहे. गावाला गणपती सभा मंडप दिलेला आहे. पेय जल योजना दिली. त्यामुळे गावातील पाण्याची समस्या सुध्दा सुटली आहे, असेही शेवटी श्री. खोतकर म्हणाले.

पान ६ वरून...

### आष्टी मतदारसंघात

मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रचारात सुरेध धस यांनीच मारली मुसंडी.. अडचणीत धावुन येणाऱ्या नेत्याचे गावागावात जंगी स्वागत

जाती धर्माच्या पलीकडे जाऊन कायम लोकांच्या मतदीला धावून जाणारे, त्यांच्या सुख दुःखात सहभागी होणारे एकमेक नेते सुरेश धस हे आहेत. आष्टी मतदार संघात त्यांच्या प्रचारात रथ विजयी वेगाने धावत असून दोनच दिवसात सुरेश धस यांनी प्रचारात मुसंडी मारली आहे... ते ज्या गावात जातील तेथील लोक धस कुटूंब कायम आमच्या मदतीला धावून येतात... इतर नेते केवळ निवडणुकीच्या तोंडावर येतात, अशा बोलक्या प्रतिक्रिया देत सुरेश धस यांचे गावा- गावात जंगी स्वागत करत आहेत... सर्वत्र होत असलेल्या या स्वागताने सर्व जाती- धर्मातील लोक सुरेश धस यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे स्पष्ट होत आहे.

### बदामराव पंडित यांच्या

एकीकडे अपक्ष निवडणूक लढत असलेल्या भाजपाचे माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांची डळमळीत भूमिका, तर दुसरीकडे वेगवेगळ्या योजनांमध्ये सामान्य माणसांची केलेली आडून आणि पक्ष फोडाफोडी करत, ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे जय भवानी साखर कारखान्याने अडवलेले पेमेंट यामुळे महायुतीच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार विजयसिंह पंडित यांच्यापासून गेवराई मतदार संघातील जनतेचा विश्वास उडालेला असतानाच, बदामराव पंडित यांना महाविकास आघाडीच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची मिळालेली उमेदवारी आणि त्याचवेळी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी गेवराई मतदार संघात स्वतंत्र उमेदवार उभा करणार नाही ही घेतलेली भूमिका बदामराव पंडितांसाठी ताकदीची बनली आहे. याचवेळी त्यांच्या सूनबाई सौ अनुरुपाताई पंडित यांनी गेवराई शहरातील अनेक कॉलनी मध्ये फेरी काढून, घरोघर जात मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेत बदामराव पंडितांसाठी मतदानरुपी आशीर्वाद मागितले. यावेळी प्रत्येक घरातील महिलांनी त्यांचे स्वागत करून बदामराव पंडित यांच्या विजयासाठी शुभेच्छा दिल्या.

### खंडेरायांचा आशीर्वाद घेऊन

सर्वसामान्य जनतेचे प्रतिनिधी म्हणुन आपण ही निवडणूक लढवत आहोत. भविष्यात माजलगाव मतदार संघातील ऊसतोड मजूरांच्या कुटुंबासाठी भरघोस योजना, तरुणांसाठी रोजगार, नवनवीन उद्योगधंदे उभारण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे बाबरी मुंडे म्हणाले. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या स्वप्नातील विकास कामांना मूर्त स्वरूप देण्यासाठी मला विजयी करावे असे आवाहन बाबरी मुंडे यांनी उपस्थितीतांना केले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती, उपसभापती, पंचक्रोशीतील सरपंच,उपसरपंच, नगरसेवक, ग्रामपंचायत सदस्य,चेअरमन, पदाधिकारी,कार्यकर्ते,ग्रामस्थ आदी मान्यवर यांच्यासह माजलगाव विधानसभा मतदारसंघातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ६ वरून...

### घराणेशाही मोडीत

नाही. तरुणाईच्या हाताला काम नाही. अशाच अनेक समस्या गेवराई मतदार संघातील जनतेला भोगाव्या लागत आहेत. मला एक वेळ संधी द्या गेवराई तालुक्याचा चेहरा मोहरा बदलण्याचं काम मी नक्कीच करेल अशी सर्वांच्या साक्षीने ग्वाही देते.

चौकट:- ग्रामीण भागात पुजा मोरे आघाडीवर

तालखेड व टाकरवण जिल्हा परिषद गटामध्ये एक विस्थापित चेहरा म्हणून पूजा मोरे सध्या आघाडीवर असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागात पुजा मोरे यांच्या कडे एक चळवळीतील युवती म्हणून देखील पाहिलं जाते. त्यामुळेच पूजा मोरे आघाडीवर आहेत.

### मतदार संघातील मतदार

राजकारण केलेले नाही मतदार संघाचा विकास हे आपले कर्तव्य समजून त्यांनी आपले काम केलेले आहे, त्यांच्या मार्गदर्शनाखालीच विजयसिंह पंडित यांनीही आपली वाटचाल सुरु केलेली आहे. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष म्हणून काम करत असताना विजयसिंह पंडित यांनी आपल्या कामाची चुणूक दाखवून बीड जिल्ह्याला एक नवी ओळख करून दिली. विकासाचा ध्यास असणाऱ्या अशा नेतृत्वाला संधी देण्याची जबाबदारी आता आपल्या सर्वांची आहे, त्यामुळे विरोधकांच्या प्रलोभनाला न भुलता येणाऱ्या २० तारखेला घड्याळ या चिन्हासमोरचे बटन दाबून विजयसिंह पंडित यांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

याप्रसंगी सावरगाव येथे महादेव जाधवर, आसाराम पिसाळ, आश्रुबा गव्हाणे, लहूराव पिसाळ, श्रीराम डोंगरे, साठेवाडी येथे रावसाहेब धोत्रे, वैजिनाथ अनभुले, जिजाभाऊ अनभुले, बाबासाहेब पवार, राजेंद्र गुजर, आनंद अनभुले, कोळगाव येथे मदनराव घाडगे, राजेंद्र कदम, विष्णूपंत जगदाळे, रमेश करांडे, मनोहर घाडगे, रमेश लोंढे, सुरेश जाधव, गाढेवाडी येथे सखाराम गाडे, महादेव गाडे, मसू मोरे, शिवाजी मोरे, तुळशीराम वावरे, पोखरी येथे शेख अकबरभाई,पांडुरंग काजळे, अशोक मोघे, श्रीराम मोघे, कल्याण हाडूळे, शेख सादेक, मुधापूरी येथे भाऊसाहेब गिरे, काका गिरे, भाऊसाहेब गिरे, जालिंदर हाटवटे, कल्याण गिरे, हनुमान गिरे, रामभाऊ भोले, माळहिवरा येथे बाजीराव माळी, तुकाराम माळी, विठ्ठल माळी, कैलास माळी, अंकुश पवार, लहू हातमोडे, महादेव थोरात, राधेशाम काकडे, शिवाजी काकडे, एकनाथ काकडे, शिराळा येथे ज्ञानेश्वर तेलुरे, राम तेलुरे, अमोल तेलुरे, ईश्वर तेलुरे, सादेक पठाण, रहिम पठाण, मनोज तेलुरे, ठाकर आडगाव येथे रुद्रा घोलप, अरुण कोकाट, सुधाकर कोकाट, रामेश्वर कोकाट, बालासाहेब काळे, आकाश सोनवणे, रावसाहेब जाधव, अशोक चव्हाण, साईराम पांढरे, कोलतेवाडी येथे अनिल पवार, लहू पवार, बाळू मुळक, गोविंद अबदर, राहुल पवार, गणेश जगताप, दत्ता पवार यांच्यासह ग्रामस्थ, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.पृथ्वीराज पंडित यांच्या प्रचार दौऱ्याला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. ठिकठिकाणी कार्यकर्त्यांनी त्यांचे वाजत-गाजत स्वागत केले. विजयसिंह पंडित यांना आमदार करून येणाऱ्या २० तारखेला शिवछत्र परिवारावर गुलाल उधळून असा विश्वास उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

राज्य लोकतंत्र शेत-शिवार
शुक्रवार, दि.८ नोव्हेंबर २०२४
४

# राज्यात उभारले जाणार दोन हजार सातशे बायोगॅस सयंत्र

## इंधनाची बचत व्हावी यासाठी केंद्र सरकारचा उपक्रम

**पुणे । प्रतिनिधी**

**इंधनाची बचत व्हावी यासाठी केंद्र सरकारच्या नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रिय खत कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांनी बायोगॅस संयंत्र उभारण्याचे आवाहन केले जात आहे. त्यानुसार गेल्या वर्षभरात राज्यात (२०२४-२५) या वर्षात राज्यात २ हजार सातशे बायोगॅस संयंत्र उभारणी झाली आहे. यावर बांधकाम, शौचालय अनुदानावर कोट्यवधींचा खर्च केला जाणार आहे. गेल्या तीन वर्षांचा विचार करता प्रतिसाद कमी झाल्याने उद्दिष्ट कमी झाले आहे.**



पशुपालक शेतकऱ्यांच्या इंधनात बचत व्हावी यासाठी केंद्र सरकारच्या नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रिय खत कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांनी बायोगॅस संयंत्र उभारणीसाठी सर्वसाधारण गट व अनुसूचित जाती, जमाती अशा प्रवर्गातील शेतकऱ्यांना अनुदान दिले जाते. पूर्वी १२ हजार आणि १३ हजार व शौचालय बांधणीसाठी १६०० रुपये प्रती युनिट अनुदान दिले जात होते. आता अनुदानात बदल केला असून बांधकाम घनमीटर नुसार अनुदान दिले जात आहे. याशिवाय बायोगॅस संयंत्राला जोडून शौचालय उभारणीसाठी १ हजार ६०० रुपयाचे अनुदान दिले जाते. जिल्हा परिषदेच्या कृषी विभागामार्फत हा बायोगॅस संयंत्र उभारणीचा उपक्रम राबवला जातो. यंदा सर्वसाधारण गटात २ हजार १००, अनुसूचित जाती गटात ४०० हजार व अनुसूचित जाती-जमाती गटात २०० असे दोन हजार सातशे बायोगॅस सयंत्र उभारणीचे नियोजन केले आहे. यंदा केवळ ७५ संयंत्राला शौचालय जोडली जाणार आहेत. साधारण चार ते पाच वर्षांपूर्वी ग्रामीण भागात बायोगॅस उभारणीला चांगला प्रतिसाद मिळत होता. मात्र अलीकडच्या दोन वर्षांत प्रतिसाद काहीसा कमी झाला आहे. वेळेवर अनुदान मिळत नसल्याचे एक कारण आहे. २०२१-२२ यावर्षी ७ हजार शौचालय उभारणीचे उद्दिष्ट होते. २०२२-२३ व २०२३-२४ वर्षात उद्दिष्ट कमी केले आहे. यंदाही उद्दिष्टात घट केली आहे. पाच वर्षांपूर्वी अहिल्यानगर जिल्ह्यात ७०० बायोगॅस उभारणीचे उद्दिष्ट होते. यंदा २५२ चे उद्दिष्ट आहे. राज्यात यंदा कोल्हापुर, पुणे, अहिल्यानगर जिल्ह्यात सर्वाधिक उद्दिष्ट आहे.

### जिल्हानिहाय बायोगॅस संयंत्र उभारणी

ठाणे : १०, पालघर : ७३, रायगड : ५०, रत्नागिरी : ५०, सिंधुदुर्ग : १००, नाशिक : १०५, धुळे : १६, नंदुरबार : १५, जळगाव : २०, अहिल्यानगर : २५२, पुणे : ३९५, सातारा : ५०, सांगली : ९२, सोलापुर : १००, कोल्हापुर : ७२०, संभाजीनगर : १२९, जालना : १४, परभणी : २१, हिंगोली : १३, बीड : ३६, नांदेड : १००, धाराशिव : ४६, लातुर : १४६, अमरावती : १२, बुलडाणा : १२, वाशीम : ११, अकोला : २, यवतमाळ : १२, नागपूर : ३३, वर्धा : ११, भंडारा : १८, चंद्रपूर : ३, गडचिरोली

# मशरूम लागवडीतून शेतकरी झाला लखपती

## आठ वर्षापासून करतोय यशस्वी शेती

**पुणे: उत्तर प्रदेशातील जौनपूर जिल्ह्यात राहणारे प्रगतीशील शेतकरी रामचंद्र दुबे यांनी कृषी क्षेत्रात स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. गेल्या आठ वर्षांपासून यशस्वीपणे मशरूमची शेती करत आहेत आणि भरपूर नफा मिळवत आहेत. रामचंद्र दुबे यांनी स्वत:च्या मेहनतीने इतर शेतकऱ्यांसाठी एक आदर्श निर्माण केला आहे.**

**मशरूम शेतीची सुरुवात :**

रामचंद्र दुबे यांचा हा प्रवास २०१७ मध्ये सुरू झाला, जेव्हा त्यांनी बक्शा येथील कृषी विज्ञान केंद्रातून मशरूम शेतीचे पाच दिवसांचे प्रशिक्षण घेतले. त्यानंतर मशरूम शेती करण्यास सुरूवात केली.

**मशरूम शेतीचे फायदे :**

मशरूम शेती ही अत्यंत फायदेशीर शेती आहे. विशेषत: त्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे कमी खर्चात लागवड करता येते, त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला नफा मिळतो. या शेतीची सर्वात खास बाब म्हणजे ही शेती घरामध्ये सुद्धा करता येते, त्यामुळे हवामानामुळे पिकाचे कोणतेही नुकसान होत नाही. मशरूम शेती विशेषत: अशा शेतकऱ्यांसाठी फायदेशीर आहे जे बहुतेक वेळा हवामानामुळे पिकाची चिंता करतात. महिलांसाठी मशरूमची लागवड एक उत्तम पर्याय आहे, कारण ती घरामध्ये करता येते. विशेषत: ग्रामीण भागात जिथे रोजगाराच्या संधी मर्यादित आहेत, तिथे मशरूम शेती हा उत्पन्नाचा एक महत्त्वाचा स्रोत बनू शकतो.

**मशरूम शेतीसाठी शेतातील उरलेल्या अवशेषांचा वापर :**

मशरूम शेतीचा आणखी एक मोठा फायदा म्हणजे त्याद्वारे पीक अवशेष ही समस्या सोडवता येते. सध्या बहुतेक राज्यात पिकाचे अवशेष शेतकऱ्यांसाठी मोठी समस्या ठरत आहे. बहुतेक शेतकरी हे अवशेष जाळतात ज्यामुळे पर्यावरणाचे आणि मातीचे नुकसान होते. या अवशेषांचा मशरूम लागवडीत वापर करून चांगला उपयोग करता येतो.

**मशरूम लागवडीसाठी विशेष प्रणाली :**

रामचंद्र दुबे बटन मशरूमच्या लागवडीसाठी एक विशेष प्रणाली वापरतात, ज्यामध्ये ते सुमारे २००० बोगींमध्ये मशरूमची लागवड करतात. याशिवाय इतर शेतकऱ्यांच्या सहकार्याने ते ऑयस्टर मशरूमचीही लागवड करतात. वर्षाला ते २० ते २५ क्विंटल बटन मशरूमचे उत्पादन करतात, ज्यातून त्यांना चांगला नफा मिळतो.

**मशरूमची लागवडीचा खर्च आणि नफा :**

रामचंद्र दुबे यांनी ऑयस्टर आणि बटन मशरूम या दोन्हीच्या लागवडीत यश मिळवले आहे. त्यांच्या मते, बटन मशरूमच्या लागवडीसाठी कंपोस्ट तयार करण्यासाठी सुमारे २८ दिवस लागतात, तर ऑयस्टर मशरूमसाठी कंपोस्ट केवळ २ ते ३ दिवसांत तयार होते. ऑयस्टर मशरूमची लागवड कमी खर्चात करता येते, तर बटन मशरूम लागवडीला थोडा जास्त वेळ आणि खर्च लागतो. शेतकरी कमी खर्चात वर्षातून फक्त दोनदा बटन मशरूमची लागवड करू शकतात, तर शेतकरी कमी खर्चात वर्षातून ८ वेळा ऑयस्टर मशरूमची लागवड करू शकतात. मात्र, बटन मशरूमला बाजारात मागणी जास्त असून त्याची किंमतही जास्त आहे. रामचंद्र दुबे सांगतात की ऑयस्टर मशरूमचे पीक अडीच महिन्यांत तयार होते, तर बटन मशरूम तयार होण्यासाठी चार महिने लागतात. जर एखाद्या शेतकऱ्याने १०१० खोलीत मशरूमची लागवड केली तर त्याची एकूण किंमत सुमारे ५ हजार रुपये आहे. या खर्चावर शेतकऱ्याला १०० टक्के परतावा म्हणजेच ५ हजार रुपयांचा नफा मिळतो.



**मशरूम लागवडीसाठी प्रशिक्षण आवश्यक ३**

रामचंद्र दुबे यांच्या मते, शेतकऱ्यांनी मशरूमची लागवड करण्यासाठी योग्य प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. योग्य प्रशिक्षणाशिवाय या शेतीत यशस्वी होणे कठीण आहे. यासाठी शेतकरी त्यांच्या जवळच्या कृषी विज्ञान केंद्राला भेट देऊन तेथून मशरूम लागवडीचे प्रशिक्षण घेऊ शकतात. कृषी विज्ञान केंद्रांमध्ये तज्ज्ञ शेतकऱ्यांना शेतीचे तंत्र आणि संबंधित माहिती देतात, जेणेकरून त्यांना ही शेती अधिक चांगल्या पद्धतीने करता येईल.

**इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणा :**

प्रगतीशील शेतकरी रामचंद्र दुबे यांची यशोगाथा ही केवळ त्यांच्या मेहनतीचे आणि समर्पणाचे फळ नाही तर इतर शेतकऱ्यांसाठीही ती प्रेरणादायी आहे. ते इतर शेतकऱ्यांनाही मशरूम शेतीचे नियमित प्रशिक्षण देतात आणि त्यांना या शेतीच्या फायद्यांची जाणीव करून देतात. त्यांच्या मते, शेतकऱ्यांनी योग्य माहिती आणि प्रशिक्षण घेऊन मशरूमची लागवड केल्यास त्यांना कमी खर्चात चांगला नफा मिळू शकतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८८९ : मोंटाना हे अमेरिकेचे ४१ वे राज्य बनले.
१८९५ : दुसराच एक प्रयोग करत असताना विल्हेम रॉंटजेन यांना क्ष किरणांचा शोध लागला.
१९३२ : अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक संघाच्या महाराष्ट्र शाखेची स्थापना.
१९३९ : म्युनिक येथे अ‍ॅडॉल्फ हिटलर प्राणघातक हल्ल्यातुन बचावला.
१९४७ : पंजाब अँड हरयाणा उच्च न्यायालयाची स्थापना.
१९६० : अटीतटीच्या लढतीत रिचर्ड निक्सन यांचा पराभव करुन जॉन एफ. केनेडी अमेरिकेचे ३५ वे राष्ट्राध्यक्ष बनले.
१९८७ : पुणे मॅरेथॉनचे पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हस्ते शानदार उद्घाटन. पुणे मॅरेथॉन ही स्पर्धा खासदार सुरेश कलमाडी यांनी सुरु केली.
१९९६ : कवी व लेखक प्रा. माणिक गोडघाटे ऊर्फ ग्रेस यांची विदर्भ साहित्य संघाच्या जीवनव्रती पुरस्काराचे पहिले मानकरी म्हणून निवड.
२००२ : जी. बी. पटनायक यांनी भारताचे ३२ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
२०१६ : तत्कालीन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५०० आणि १००० च्या नोटा व्यवहारातून रद्द केल्या.
२०१६ : डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे वे४५ अध्यक्ष म्हणून निवडून आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६५६ : खगोलशास्त्रज्ञ एडमंड हॅले यांचा जन्म. धूमकेतूची कक्षा मोजणारे पहिले शास्त्रज्ञ. (मृत्यू: १४ जानेवारी १७४२)
१८३१ : भारताचे वे३० गव्हर्नर-जनरल रॉबर्ट बुलवेर-लिटन यांचा जन्म. (मृत्यू: २४ नोव्हेंबर १८९१)
१८६६ : ऑस्टिन मोटर कंपनीचे संस्थापक हर्बर्ट ऑस्टिन यांचा जन्म. (मृत्यू: २३ मे १९४१)
१८९३ : थायलँडचा राजा प्रजाधिपोक ऊर्फ राम (सातवा) यांचा जन्म. (मृत्यू: ३० मे १९४१)
१९०९ : स्वातंत्र्यसैनिक व पत्रकार नरुभाई लिमये यांचा जन्म. (मृत्यू: ३० ऑगस्ट १९९८)
१९१७ : कर्करोग संशोधन क्षेत्रातील अग्रणी शास्त्रज्ञ डॉ. कमल रणदिवे यांचा जन्म. (मृत्यू: ११ एप्रिल २०००)
१९१९ : प्रसिद्ध लेखक, नाटककार, संगीतकार, दिग्दर्शक, पटकथालेखक आणि अभिनेते पुरूषोत्तम लक्ष्मण उर्फ पु. ल. देशपांडे यांचा जन्म. (मृत्यू: १२ जून २००० पुणे)
१९२० : भारतीय अभिनेत्री, नृत्यांगना सितारादेवी यांचा जन्म. (मृत्यू: २५ नोव्हेंबर २०१४)
१९२७ : भारताचे उपपंतप्रधान, केन्द्रीय माहिती व नभोवाणी मंत्री, भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांचा जन्म.
१९५३ : भारतीय राजकारणी नंद कुमार पटेल यांचा जन्म. (मृत्यू: २५ मे २०१३)
१९७० : मायस्पेस चे सहसंस्थापक टॉम एंडरसन यांचा जन्म.
१९७४ : नारुतो चे जनक मसाशी किशिमोतो यांचा जन्म.
१९७६ : ऑस्ट्रेलियाचा जलदगती गोलंदाज ब्रेट ली यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२२६ : फ्रान्सचा राजा लुई (आठवा) यांचे निधन. (जन्म: ५ सप्टेंबर ११८७)
१६७४ : कवी, विद्वान व मुत्सद्दी जॉन मिल्टन यांचे निधन. (जन्म: ९ डिसेंबर १६०८)
१९६० : भारतीय हवाई दलप्रमुख सुब्रतो मुखर्जी यांचे निधन.
२०१३ : भारतीय पत्रकार आणि अभिनेते अमांची वेक्कत सुब्रमण्यम यांचे निधन. (जन्म: २ जानेवारी १९५७)
२०१५ : भारतीय एअर मर्शल ओमप्रकाश मेहरा यांचे निधन. (जन्म: १९ जानेवारी १९१९)
२०१५ : उद्योगपती लॉर्ड स्वराज पॉल यांचे सुपुत्र तसेच कॅपॅरो ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंगद पॉल यांचे अपघाती निधन.

## काळ्या गव्हाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी

# गहू संशोधन केंद्राचा महत्वाचा इशारा



**मधुमेहासाठी उपयुक्त तेसच खाण्यासाठी पौष्टिक म्हणून काळया गव्हाला बाजारात चांगली मागणी आहे. काळ्या गव्हाची लागवड राजस्थान, पंजाब,हरियाणा,हिमाचल प्रदेश येथे मोठ्या प्रमाणावर केली जाते. मात्र, महाराष्ट्रातील शेतकरीदेखील काळ्या गव्हाच्या शेतीकडे वळत आहेत. त्यामुळे बरेच शेतकरी देखील गेल्या गव्हाची लागवड करताना दिसून येत आहेत. मात्र तुम्ही सुद्धा काळ्या गव्हाची लागवड करण्याचा विचार करीत असाल तर ही बातमी महत्वाची आहे. काळ्या गव्हाच्या नावाखाली शेतकऱ्यांची दिशाभूल होत असल्याचे समोर आले आहे. बियाणे कायद्यात त्या वाणाची नोंदच नाही. महाराष्ट्रात काळ्या गव्हाच्या लागवडीची शिफारस पण नसल्याचे समोर आले आहे.**

भारतीय गहू संशोधन केंद्रामध्ये गव्हाचे एकूण २२ वाण नोंद करण्यात आले आहेत. १९६५ च्या बियाणे कायद्याच्या राजपत्र अधिसूचनेनुसार वाणाची नोंद होणे महत्त्वाचे आहे. केंद्राने केलेल्या मूल्यांकन निकषात काळा गहू हा वाण सरस ठरलेला नाही, अशी माहिती समोर आलेली आहे. काळ्या गव्हाची उत्पादकता इतर वाणांच्या तुलनेत कमी आहे. इतर गहू वाणांच्या तुलनेत प्रथिने, लोह, जस्त यांची उपलब्धता अधिक आहे. इतर वाणांच्या तुलनेत रोगप्रतिकारक नाही. उत्पादनपश्चात विक्रीकरीता अडचणींना सामोरं जावं लागू शकतं, असं गहू संशोधन केंद्राकडून जाहीर करण्यात आले आहे.

**राष्टीय स्तरावरून शिफारस नसताना लागवड :**


अव्वाच्या सव्वा दराने काळ्या गव्हाचे बियाणे विक्रीचा काळाबाजार सुरू आहे. तर काही शेतकरी अधिक दराच्या लोभात काळ्या गव्हाची लागवड करत असल्याचे समोर आले आहे. मात्र, भारतीय गहू संशोधन संस्थेत गहू पिकाचे २२ वाण नोंदणीकृत आहेत. नोंदणीकृत २२ गहू वाणांच्या तुलनेत काळ्या गव्हात पोषकतत्वे, रोगप्रतिकारकता व उत्पादकता कमी दिसून आले आहे. काळ्या गव्हाच्या वाणासंबंधी राष्ट्रीय स्तरावरून शिफारस नसताना लागवडी केल्या जात असल्याने मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी याबाबत विचार करण्याची गरज आहे.

# हिवाळ्यात ट्रॅक्टरची अशी घ्या काळजी

**पावसाळा संपूल आता हिवाळा हंगाम सुरू झाला आहे. प्रत्येक हंगामात ट्रॅक्टरची विशेष काळजी घेणे आवश्यक असते. हिवाळ्याच्या हंगामात, बहुतेक ट्रॅक्टर शेतात काम करताना त्यांच्या इंजिन आणि इतर भागांमध्ये समस्या निर्माण करतात. अशा परिस्थितीत या समस्यांवर मात करण्यासाठी काही टिप्स फॉलो करून हिवाळ्यात ट्रॅक्टरची विशेष काळजी घेऊ शकता, ज्यामुळे शेती आणि वाहतुकीची कामे सुरळीत चालून ट्रॅक्टर चांगली कामगिरी करू शकते.**

**टायरचा दाब/प्रेशर :**

जर तुम्ही अशा ठिकाणी राहत असाल जिथे बऱ्याचदा बर्फ पडतो किंवा तुमचे घर थंड भागात असेल, जिथे वारंवार पाऊस पडत असेल, तर तुमच्या ट्रॅक्टरच्या टायर्स रस्त्यावरून घसरू शकतात. अशा परिस्थितीत, ट्रॅक्टरचा टायर घसरण्यापासून रोखण्यासाठी योग्य टायरचा दाब राखणे फार महत्वाचे आहे. याशिवाय, थंड वातावरणात टायरचा दाब कमी होऊन ट्रॅक्टरचा तोल बिघडू शकतो. यासाठी, तुम्ही तुमच्या ट्रॅक्टरच्या टायर्सचा दाब नियमितपणे तपासावा. ट्रॅक्टरच्या टायरचा दाब मोजण्यासाठी टायर मॉनिटरिंग सिस्टम वापरू शकता.



**बॅटरीची काळजी घ्या :**

हिवाळ्यात ट्रॅक्टरच्या बॅटरीवर मोठ्या प्रमाणात परिणाम होतो, त्या दरम्यान बॅटरी वेगाने डिस्चार्ज होऊ शकते. हिवाळा सुरू होण्याआधीच, तुम्ही तुमच्या ट्रॅक्टरच्या बॅटरीची स्थिती, टर्मिनल्स आणि चार्जिंग सिस्टीम तपासून घ्या, जेणेकरून थंडीचा बॅटरीवर फारसा परिणाम होणार नाही. जर बॅटरी खूप जुनी असेल तर ती बदलणे चांगले. याशिवाय, तुम्हाला ट्रॅक्टरची बॅटरी चार्ज करावी लागेल आणि बॅटरी कनेक्शनची स्वच्छता राखावी लागेल.

**इंजिन ऑइल तपासा :**

ट्रॅक्टरच्या इंजिनची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी इंजिन ऑइल महत्त्वाची भूमिका बजावते, यामुळे तुमच्या ट्रॅक्टरचे आयुष्यही चांगले राहते. यासाठी तुम्ही इंजिन ऑइल नियमितपणे तपासत राहावे. थंडीच्या वातावरणात इंजिन ऑइल घट्ट होऊ शकते, ज्यामुळे इंजिन योग्यरित्या काम करत नाही आणि ट्रॅक्टर सुरू करण्यात अडचण येते. हे टाळण्यासाठी, हिवाळा सुरू होण्यापूर्वी तुम्ही ट्रॅक्टरचे इंजिन ऑइल आणि ऑइल फिल्टर तपासले पाहिजे.

**कूलेंट तपासा :**

हिवाळ्याच्या मोसमात ट्रॅक्टरचे इंजिन गोठण्यापासून वाचवण्यासाठी, आपण कूलंटची विशेष काळजी घ्यावी. थंड हवामान सुरू होण्यापूर्वीच, आपण कूलंटची योग्य मात्रा आणि गुणवत्ता तपासली पाहिजे. ट्रॅक्टर इंजिनसाठी कूलंट चांगले असल्यास इंजिन थंड होण्यापासून सुरक्षित राहते आणि जास्त गरम होणार नाही.

**ड्राइव्ह बेल्ट तपासणी :**

ट्रॅक्टरमध्ये पट्टा तुटणे, सडणे आणि घसरणे ही समस्या सामान्य आहे. हिवाळा हंगाम सुरू होण्यापूर्वी शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर चालविण्याच्या पट्ट्याची पाहणी करावी. बेल्टची खराब फिटिंग किंवा जीर्ण पट्ट्यामुळे ट्रॅक्टर चालवण्यात समस्या निर्माण होतात. जर बेल्ट खराब झाला असेल तर तुम्ही स्थानिक ट्रॅक्टर डीलरकडे जाऊन तो बदलून घेऊ शकता.

cmyk



# माळी समाजाच्या ३३ उमेदवारांसह मुख्यमंत्री शिंदे, फडणवीस, पवार यांना महात्मा फुले युवा दलाचा पाठींबा

## पत्रकार परिषदेत महात्मा फुले युवा दल संस्थापक प्रमुख ॲड.सतिष शिंदे यांनी केली घोषणा

बीड । प्रतिनिधी

राज्यातील माळी समाजातील ३३ उमेदवारांना महात्मा फुले युवा दलाच्या वतीने जाहीर पाठिंबा देत असल्याची घोषणा महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख ॲड सतिष शिंदे यांनी बीड येथे पत्रकार परिषदेत बोलताना केली.

यावेळी बोलताना शिंदे म्हणाले की जो समाजाच्या हिताचे काम करील त्याच्या पाठीशी महात्मा फुले युवा दल राहील. महायुती सरकारमधील मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी समाजाचा सन्मान केला.माळी समाजाचे श्रद्धास्थान असलेले श्रीक्षेत्र संत शिरोमणी सावता महाराज यांची संजीवनी समाधी अरण ला अ तीर्थक्षेत्राचा व विविध विकास कामासाठी निधी महायुती सरकारने दिला तसेच महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीमाई फुले यांनी पुणे येथील पहिली मुलींची शाळा ज्या भिडे वाड्यात केली त्या भिडे वाड्याला राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा दिला ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांचे जन्म गाव असलेले नायगाव येथे विविध विकास कामे केली मोठा निधी देऊन त्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे . समाजाचे कर्तव्य आहे. चांगल्या काम करणाऱ्यांना आपला पाठिंबा असावा अशी आमची भूमिका आहे .त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्यासह राज्यातील छगनराव भुजबळ (राष्ट्रवादी अजित पवार )

विधानसभा : येवला (नाशिक ),

२) अतुलभाऊ सावे (भाजपा )

विधानसभा :छत्रपती संभाजी नगर (पूर्व ), जयकुमार गोरे (भाजपा )

विधानसभा: मान खटाव (सातारा ), चंदूभाऊ यावलकर (भाजपा )

विधानसभा:मोर्शी वरुड (अमरावती ),सौ.देवयानी फ़रांदे (भाजपा)विधानसभा: नाशिक मध्य ( नाशिक), सौ मनिषाताई चौधरी (भाजपा)विधानसभा: दहिसर (मुंबई ),आ. बळीराम भाऊ सिरस्कार (शिवसेना शिंदे गट )



विधानसभा : बाळापुर (अकोला ) , वसंत भाऊ गिते (शिवसेना उद्धव ठाकरे ),विधानसभा: नाशिक (पश्चिम),अजय चौधरी (शिवसेना उद्धव ठाकरे ),विधानसभा : शिवडी (मुंबई ), सिध्दराम म्हेत्रे ( काँग्रेस )

विधानसभा: अक्कलकोट(सोलापूर ), महेश गणगणे (काँग्रेस )विधानसभा : अकोट (अकोला ), डॉ स्वातीताई वाकेकर (काँग्रेस )विधानसभा : जळगाव जामोद (बुलडाणा ),

सौ अश्विनी ननवरे-कदम (शरद पवार राष्ट्रवादी )विधानसभा: खडकवासला (पुणे ),भिमराव धोंडे (अपक्ष) ,विधानसभा : आष्टी (बीड ), समीरभाऊ भुजबळ (अपक्ष )विधानसभा : नांदगाव (नाशिक ), परशुराम माळी (शेतकरी संघटना )विधानसभा : पलूस कडेगाव (सांगली ),श्रीहरी (तानाजी) माळी (राष्ट्रीय समाज पक्ष)विधानसभा: धाराशीव

प्रकाश दिलवाले (राष्ट्रीय समाज पक्ष),विधानसभा :पैठण (छ.संभाजीनगर ), रामप्रसाद थोरात (वंचीत),विधानसभा : परतूर आष्टी (परभणी ), शाम गोरे (राष्ट्रीय समाज पक्ष),विधानसभा : औसा (लातूर), सौ. संगीता अशोक बनकर (बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टी ) विधानसभा:बल्लारपूर (चंद्रपूर ), अण्णा साहेब शेलार (अपक्ष )

विधानसभा : श्रीगोंदा, प्रदिप साहेबराव मानकर (वंचित)

विधानसभा : अचलपुर (अमरावती ),किशोर जेजुरकर (वंचित)विधानसभा :वैजापूर (छ संभाजीनगर ),डॉ अभिलाषाताई गावतुरे (अपक्ष)

विधानसभा : बल्लारपूर (चंद्रपूर ) विजय ढाकुलकर (अपक्ष )

विधानसभा :अमरावती, हिलाल आण्णा माळी (अपक्ष)

विधानसभा : धुळे ग्रामीण ,डॉ उत्तमराव महाजन (अपक्ष )

विधानसभा: भडगाव पाचोरा (जळगाव ),भगवानभाऊ महाजन (अपक्ष)विधानसभा : पारोळा-एरडोल (जळगाव ),

अविनाश फरांदे (अपक्ष )

विधानसभा : वाई (सातारा ),

ॲड मंगेश ससाणे (अपक्ष )

विधानसभा : हडपसर (पुणे ),

प्रा संदानद माळी (अपक्ष)

विधानसभा : बुलढाणा, संजय बागुल (अपक्ष )विधानसभा :चांदवड (नाशिक ) आदी माळी समाजातील ३३ उमेदवारांना यामध्ये अपक्ष आणि इतर पक्षातील सर्व उमेदवारांना पाठिंबा जाहीर देत असल्याची घोषणा ॲड सतिष शिंदे यांनी या पत्रकार परिषदेत केली. यावेळी महात्मा फुले युवा दल जिल्हा प्रमुख अजय शिंदे, विद्यार्थी आघाडीचे जिल्हाप्रमुख पंकज साळुंके, उपजिल्हाप्रमुख संजय काळे, बीड तालुकाप्रमुख विठ्ठल साळुंके यांच्यासह मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते उपस्थित होते.

# येडेश्वरी साखर कारखान्याचा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा संपन्न!

केज । प्रतिनिधी

येडेश्वरी साखर कारखान्याच्या सन २०२४-२५ या वर्षाच्या अकराव्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ बीड जिल्ह्याचे खासदार तथा येडेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन मा. खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या शुभहस्ते आणि शेतकरी कामगार पक्षाचे राज्य कमिटी सदस्य भाई मोहन गुंड, माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. सारिका सोनवणे व सोनवणे परिवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

रामेश्वर उबाळे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सीमा रामेश्वर उबाळे यांच्या शुभ हस्ते विधिवत पूजा करण्यात आली.

सुरुवातीला कार्यक्रमाचे प्रास्ताविक कारखान्याचे संचालक प्रा. बाळकृष्ण (बापु) भवर यांनी केले तर बाळासाहेब गलांडे,



नारायण आबा शिंदे, यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या प्रसंगी ज्येष्ठ नेते नवाब मामु, खरेदी विक्री संघाचे चेअरमन बालासाहेब दादा बोराडे, व्हॉईस चेअरमन पिंटू ठोंबरे, दिलिप आबा गुलभिले, रमेश आबा शिंदे, न. प. केजचे गटनेते भाऊसाहेब गुंड, माजी सभापती अशोक तारळकर, नारायण शिंदे, विलास जोगदंड, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षा सौ. संजीवनीताई देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे केज तालुकाध्यक्ष शंकर जाधव, बंडू चौधरी, लाला वायबसे, शितल लांडगे, नर्गिस बागवान, बाळासाहेब गलांडे शरिफभाई सय्यद, राहुल खोडसे तसेच सभासद, शेतकरी, ठेकेदार, कामगार व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'' कारखान्याच्या जडणघडणीत ज्यांचा सिंहाचा वाटा आहे ते शेतकरी आणि कामगार यांचे हित कारखाना होणार असून शेतकऱ्यांच्या ऊसाला एफआरपी पेक्षा जास्त भाव देणार आहे. तसेच कामगार वर्गांना समाधान कारक पगार दिला जाणार आहे.''

- खा. बजरंग सोनवणे

चेअरमन येडेश्वरी साखर कारखाना

''कारखान्याच्या माध्यमातून खा. बजरंग सोनवणे यांनी शेतकरी आणि कामगार वर्गासह तरुणांच्या हाताला काम देवून त्यांचे कल्याण केले आहे.''

-भाई मोहन गुंड,शेकाप नेते

# तेरा गुन्हेगार जिल्ह्यातून हद्दपार

## पोलीस अधीक्षक बंसल यांची कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात शरीराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गुन्हे करणारे रेकॉर्डवरील गुन्हेगार हे टोळी बनवुन वारंवार शरीराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गुन्हे करीत असल्याने, पोलीस ठाणे तालुका जालना हद्योत टोळीने शरिराविरुध्दचे व अग्नीशस्त्राचे जोरावर शहरात दहशतीचे गुन्हे करणारे किरण देवानंद भोसले टोळी सदस्य , सोनु संतोष जाधव नुतन वसाहत जुना जालना, सचिन शिवाजी जाधव एकता चौक, चंदनझिरा , विशाल संतोष अवसरे रा.नुतन वसाहत जुना , विशाल शिवाजी गायकवाड नुतन वसाहत जुना जालना, अविनाश प्रकाश लोंढे रा.नुतन वसाहत जुना जालना ,गौरव मिलीद गवई नुतन वसाहत जुना जालना, चंद्रकांत गंगाधर जाधव नूतन वसाहत जुना जालना यांना जालना जिल्हयातुन (०१) वर्षासाठी हद्यपार करण्यात आले आहे.

तसेच पोलीस ठाणे बदनापुर हद्यीतील गणेश प्रल्हाद डाके वय २९ वर्ष रा. मांजरगाव ता. बदनापुर ,व टोळी सदस्य किशोर कैलास वाकडे मांजरगाव ता. बदनापुर, गजानन हरीभाऊ आडसुळ वय मांजरगाव ता. बदनापुर , गुलजारखों कादरखों पठाण मांजरगाव ता. बदनापुर ,कृष्णा अर्जुन लोखंडे चांभारवाडा बदनापुर ,शोहेव सांडु शेख डोकसाळ ता. बदनापुर यांना जालना जिल्हयातुन (०३) महिन्यासाठी हद्यपार करण्यात आले आहे. वरील एकुण (१३) रेकॉर्डवरील गुन्हेगारांना जालना जिल्ह्यातून हद्दपार करणेबाबत महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ५५(१) नुसार प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे तालुका जालना व बदनापुर यांनी हद्दपार प्रस्ताव पोलीस अधीक्षक कार्यालय जालना येथे पाठविले होते. हद्दपार प्राधिकरण तथा मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल यांनी सुनावणी घेऊन वरील सर्व गुन्हेगारांना जालना जिल्ह्यातुन हद्दपारीचा आदेश पारित केला आहे. जिल्ह्यातील विविध पोलीस ठाणेचे अभिलेख पडताळून आवश्यकते प्रमाणे गुन्हेगारांविरुध्द अशा स्वरुपाची कारवाई करण्यात येणार आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, पोलीस निरीक्षक, सुदाम भागवत, श्री.एस. आर. उणवणे, पोलीस अंमलदार पोहेकॉ फुलचंद हजारे, रुस्तुम जैवाळ, कैलास खाडे, जगदीश बावणे, रामप्रसाद पव्हरे, सतीष श्रीवास, किशोर पुंगळे, संजय सोणवणे, सचीन राऊत केलेली आहे.

# आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली कार्यकर्त्यांची बैठक

## शरदचंद्र पवार साहेबांच्या सभेचे झाले नियोजन

**बीड । प्रतिनिधी**

९ नोव्हेंबर २०२४ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार साहेब यांची बीड येथे सभा होणार आहे. या सभेच्या नियोजनासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.५) रोजी सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांची राष्ट्रवादी भवन, बीड येथे बैठक घेतली.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) व मित्रपक्षांचा महाविकास आघाडीचे, बीड विधानसभा मतदारसंघातून



अधिकृत उमेदवार असलेले आ.संदीप क्षीरसागर यांनी मंगळवार (दि.५) रोजी मतदारसंघातील सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांची बैठक घेतली. या बैठकीत, ९ नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या शरदचंद्र पवार साहेबांच्या सभेच्या अनुषंगाने नियोजन करण्यात आले. तसेच प्रचार व इतर सर्व महत्त्वाच्या बाबींवरही चर्चा करण्यात आली. या बैठकीस बीड विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे सर्व पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# निष्ठावंत शिवसैनिक काँग्रेस सोबत

जालना । प्रतिनीधी

सच्चा व निष्ठावंत शिवसैनिक हा आपल्या सोबत असून त्यांना कितीही आमिष दाखवण्याचा प्रयत्न झाला तरी ते बळी पडणार नाहीत असे स्पष्ट करून त्यांच्या बळावरच जालना विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास गोरंटयाल यांचा विजय निश्चित असल्याचा दावा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी येथे बोलतांना केला.

जालना विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार कैलास गोरंटयाल यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या महाविकास आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या बैठकीत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी उमेदवार कैलास गोरंटयाल,



मुरलीधर शेजुळ, राजेंद्र राख, शिवाजी शेजुळ, बाबूराव पवार, नंदकिशोर जांगडे, बाला परदेशी, प्रमोद रत्नपारखे, किशोर मघाडे, शेख फारुख, मनकर्णाताई डांगे, नंदाताई पवार, मंगलबाई मेटकर, राजेंद्र जाधव, भास्करराव साळवे, वैभव उगले आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना अंबेकर म्हणाले की, वॉर्डातील जनसंपर्क आणि निवडणुकीतील तंत्र कार्यकर्त्यांना चांगल्या प्रकारे कळते त्यामुळे नेत्यांपेक्षा कार्यकर्त्यांना निवडणूक चांगली कळती. नेत्यांमध्ये विश्वास दांडगा असला की, कार्यकर्तेही उत्साहाने काम करतात. मतदारांची मानसिकता ही कार्यकर्त्यांच्या लक्षात येते असे सांगून पक्षाची कितीही हवा असू द्या, नेता कसाही असू द्या, शेवटी कार्यकर्त्यांच्या बळावरच विजय मिळत असतो आणि खरा व निष्ठावंत शिवसैनिक सोबत असल्याने मविआचे उमेदवार कैलास गोरंटयाल यांचा विजय कुणीही रोखू शकत नाही असेही अंबेकर यांनी शेवटी स्पष्ट केले. तत्पूर्वी राजेंद्र राख, शिवाजी शेजुळ, बाबूराव पवार, नंदकिशोर जांगडे, प्रमोद रत्नपारखे, किशोर मघाडे यांनी आपल्या भाषणात मविआचे उमेदवार कैलास गोरंटयाल यांच्या विजयासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. संचलन राम सावंत यांनी तर शेवटी आभार बाला परदेशी यांनी मानले.

### पदाधिकारी, कार्यकर्त्यांना समान न्याय दिला जाईल - आ. गोरंटयाल

आपल्या विजयासाठी दिवस रात्र झटत असलेल्या कार्यकर्त्यांची निश्चितपणे जाणीव आहे. त्यामुळे मविआतील सर्व सहकारी पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना समान न्याय दिला जाईल अशी ग्वाही उमेदवार आ. कैलास गोरंटयाल यांनी यावेळी बोलतांना दिली. प्रचारासाठी मविआतील घटक पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी योग्य पद्धतीने नियोजन करावे. विजय आपलाच होणार असून फक्त किती मताधिक्य मिळणार याची प्रतीक्षा आहे असा ठाम विश्वास व्यक्त करून निवडणुकीच्या सुरुवातीपासून आपल्या प्रतिस्पर्ध्यांनी गुंडागर्दी आणि दडपशाही करण्याचा प्रयत्न चालवला आहे. त्यांच्या या दडपशाहीला आपण या निवडणुकीत कायमस्वरूपी हद्दपार करणार असल्याचे गोरंटयाल यांनी यावेळी बोलतांना सांगितले.

# उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आ. पंकजाताई मुंडे यांनी पर्वती मतदारसंघातून फोडला पुण्यातील प्रचाराचा नारळ

पुणे । प्रतिनिधी

उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी आज पर्वती विधानसभा मतदारसंघातून भाजपा महायुतीच्या प्रचाराचा नारळ फोडला. पर्वतीमधून माधुरीताई मिसाळ चौथ्यांदा विजयी होणं ही जनतेचीच इच्छा आहे, त्यामुळे त्या विक्रमी मतांनी विजयी होतील असा विश्वास आ. पंकजाताईंनी व्यक्त केला तर विरोधकांनी कितीही प्रयत्न केला तरी लाडकी बहिण योजना बंद होणार नाही असं उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

भाजपा महायुतीच्या पुण्यातील उमेदवारांच्या प्रचाराचा नारळ आज देवेंद्र फडणवीस, आ. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते फोडण्यात आला, त्याप्रसंगी बिबवेवाडी येथे आयोजित




केलेल्या प्रचार सभेत ते बोलत होते. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उमेदवार माधुरीताई मिसाळ, विजय शिवतारे, आ. अमित गोरखे, धीरज घाटे आदींसह महायुतीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. पंकजाताई मुंडे सभेस संबोधित करताना म्हणाल्या, सभेला मोठ्या संख्येने लोक आले आहेत. हा प्रतिसाद पाहून ज्याच्या सभेला तुम्ही आला आहात त्यांना निवडून देण्याची जनतेची इच्छा दिसून येत आहे. ही प्रचार सभा नसून माधुरीताईंच्या विजयाची सभा आहे. सन २००९ मध्ये माझे तिकिट जाहीर झाले पण माधुरी मिसाळ यांचे तिकीट जाहीर होईपर्यंत लोकनेते मुंडे साहेब आनंदी झाले नव्हते कारण सतीश मिसाळ हे त्यांचे देखील कुटुंब होते. मतदारसंघातील सरकारच्या योजना मी सांगणार नाही पण मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासाठी माधुरी मिसाळ यांनी प्रयत्न केले आहे. त्यांचे कोणते काम कधीच अडवले जात नाही. केवळ आमदार होऊन विकास होऊ शकत नाही त्यासाठी राज्यात सत्ता येणे आवश्यक असते. २०१९ मध्ये सर्वात मोठा पक्ष भाजप निवडून आला पण थोडक्यात सत्ता गेली आहे. आता नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले आहेत, देशात विकासाचा हौद त्यांनी भरला आहे, हा विकास तुमच्यापर्यंत आणायचा असेल राज्यात महायुतीची पाईपलाईन आणावी लागेल, त्यासाठी एकेक आमदार महत्वाचा आहे. माधुरीताईंना विजयी करून पुन्हा एकदा महायुती सत्तेवर आणा असे आवाहन आ. पंकजाताईंनी केले.

# विरोधकांनी भावाभावात भांडणे लावण्यासाठी सत्तेचा उपयोग केला -बाळासाहेब आजबे

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघामध्ये विरोधकांनी सत्तेमध्ये असताना विकास कामे करण्या ऐवजी गावागावात ,भावाभावात भांडणे लावण्यासाठी सत्तेचा उपयोग केला या उलट आम्ही सत्तेत असताना गेली पाच वर्ष संपूर्ण मतदारसंघ शांत ठेवण्याचे काम केले, सत्तेचा उपयोग आम्ही विकास कामे व जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी केला असे प्रतिपादन आमदार बाळासाहेब आजबे यांनी कोतन, पांढरवाडी फाटा येथे प्रचारादरम्यान बोलताना केले .

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार बाळासाहेब आजबे काका यांनी गुरुवार दिनांक ७ नोव्हेंबर रोजी प्रचार दौऱ्यादरम्यान कोतन ,पांढरवाडी फाटा येथे बोलताना सांगितले की आपण गेल्या पाच वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात मतदारसंघात विकास कामे केली आहेत परंतु विरोधकांना ते देखवत नाहीत त्यामुळे मी त्यांना असा प्रश्न विचारतो की तुम्ही सत्तेत असताना



किती कामे केली व ते आज कुठे आहेत विकास कामे करणे ऐवजी विरोधक फक्त कागदावरच बिले उचलण्यात दंग होते ,आम्ही प्रत्येक ठिकाणी विकास निधी देण्याचा प्रयत्न केला आहे विरोधकांनी सत्तेचा उपयोग स्वतःची घरे भरण्याकरता केल्यामुळे त्यांना विकास कामे काय असतात हे समजण्या बाहेरचे आहे आम्ही सत्तेत असताना कुठेही भांडणे होऊ दिली नाहीत उलट गुन्हा नोंद होत असेल तर आपसात मिटून घ्या असे फोन आम्ही पोलीस स्टेशनला केले आहेत त्यामुळे आम्ही सत्तेचा उपयोग जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी केला आहे हे सर्व जनतेला माहिती आहे त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीमध्ये सर्वसामान्य जनता आपल्या पाठीशी खंबीरपणे उभी असून जनतेने आपल्याला मोठ्या मताधिक्केने निवडून द्यावे असे आवाहन यावेळी बोलताना आमदार बाळासाहेब आजबे यांनी केले या प्रचार दौऱ्या दरम्यान गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

cmyk

राज्य लोकतंत्र

महासंग्राम

शिवसेना

शुक्रवार दि. ०८ नोव्हेंबर २०२४

६

# आष्टी मतदारसंघात सुरेश धस यांनीच मारली मुसंडी

**आष्टी । प्रतिनिधी**

अंमळनेर परिसरामध्ये शैक्षणिक वातावरण तयार झाल्यामुळे अनेक मुलं नोकरी धंद्याला लागले अनेक तरुण देश सेवेत सैनिक म्हणून गेले याचा मला सार्थ अभिमान वाटत आहे. असे प्रतिपादन सुरेश धस यांनी केले. २३१ आष्टी-पाटोदा-शिरुर का. विधानसभा मतदारसंघाचे भाजपा-शिवसेना- रि.पा.ई. (आ) आणि मित्र पक्षांचे अधिकृत उमेदवार म्हणून अंमळनेर व डोंगरकिन्ही सर्कलमधील गावभेट दौऱ्यात ते बोलत होते.

सुरेश धस पुढे बोलताना म्हणाले, मी जिल्हा परिषद चा उपाध्यक्ष असताना सर्वात अगोदर जरेवाडीच्या शाळेच्या बाबतीमध्ये गावकऱ्यांनी मागणी करत जिल्हा परिषद शाळेकडे लक्ष वेधून या शाळेकडे लक्ष देणे

### अडचणीत धावुन येणाऱ्या नेत्याचे गावागावात जंगी स्वागत

गरजेचे असल्याचे निदर्शनास आणून देत गोरगरीब सामान्य कुटुंबातील मुलांचे शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचं आहे आणि याबाबतीमध्ये या संपूर्ण परिसरामध्ये एक चळवळ उभा राहिली या चळवळीमध्ये प्रत्येक शिक्षकाने गावकऱ्यांनी योगदान दिले आणि त्यांना लागेल त्या सगळ्या सुख सुविधा पुरविण्यामध्ये मी कुठेही मागे पाहिले नाही. २०१४ नंतर एकही शाळा खोली किंवा शाळेला कोणाचीही व्हिजिट त्या ठिकाणी झालेली नसताना शेवटी आपण आपलं भविष्य घडवण्यासाठी भौगोलिक परिस्थिती आपल्या भागातील अत्यंत खराब आहे परंतु शिक्षण हे आपल्या सर्वांसाठी



महत्त्वाचं माध्यम हा उदात्त हेतूने शिक्षणाला पुढील अशा पद्धतीने सगळ्या सुविधा देणे हे लोकप्रतिनिधीची जबाबदारी घेऊन ती मी पूर्णपणे या ठिकाणी पार पाडली.हा डोंगराळ भाग असल्याने शेतकऱ्यांना रानडुकराचा या परिसरामध्ये खूप मोठा त्रास होता. याचा बंदोबस्त करण्याचा देखील अनेक वेळा प्रयत्न केला आणि तो यशस्वी देखील झाला.शेतकरी डुकराच्या होणारा त्रासाला वैतागलेला आहे हे दाखव त्यांच्या बोलण्यातून दिसून येत असे त्यामुळे मी अनेक प्रयोग केले. असे अनेक विकास कामांसोबत प्रत्येकाच्या अडीअडचणीसाठी मी सदैव तत्पर राहिलो असून या व्यतिरिक्त जो तुमचे काम करत असेल तर आपण लोकशाहीमध्ये आपल्याला अधिकार आहे तो अधिकार आपण त्या पद्धतीने बजावावा अशी भावनिक साद महायुतीचे उमेदवार सुरेश धस यांनी मतदारांना केली.याप्रसंगी अंमळनेर व डोंगरकिन्ही सर्कल मधील पांढरवाडी फाटा (गांधनवाडी, पांढरवाडी, संकुडवाडी),खडकवाडी,कोतन (बेदरवाडी),काकडहिरा,अंमळनेर(उंडेवाडी, साबळेवाडी व पन्हाळकरवाडी, डागाचीवाडी, मिसाळवाडी, दौलतवाडी),निरगुडी (बेदरवाडी)पिंपळवंडी (अंबेवाडी, चंद्रेवाडी, जरेवाडी, थोपटवाडी, सरदवाडी, नाकाडवाडी, हांडेवाडी)उखंडा,जाधववाडी (घोळेवाडी, गायकवाडी, भराटवाडी)पिठ्ठी,पांगरी (पांगरी खालील पूर्ण वाड्या व वस्त्या), नायगाव,डोंगरकिन्ही (डोंगरकिन्ही गाव अंतर्गत वाड्या व वस्त्या), रोहतवाडी (भक्ताचे गोठे), कारेगाव (जन्नेवाडी, कंठाळवाडी), डोमरी (अंतर्गत सर्व वाड्यांसह वस्त्या), नाळवंडी (भाटेवाडी, वाड्या व वस्त्या),वड्झरी (सर्व वाड्यांसह वस्त्या), धसपिंपळगाव (तगारा, महेंद्रवाडी, सगळेवाडी) या गावांतील ग्रामस्थ व कार्यकर्ते

पान ३ वर

## बदामराव पंडित यांच्या विजयासाठी अनुरूपाताई पंडितांच्या घरोघर भेटी

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार बदामराव पंडित यांची मशाल घराघरात पोहचविण्यासाठी सौ अनुरुपाताई युधाजित पंडित यांनी गेवराई शहरातील अनेक कॉलनी मध्ये पदयात्रा काढून मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेतल्या. या फेरीला शहरातील महिलांनी भरभरून



प्रतिसाद दिला.

विकास कामासह गोरगरिबाच्या मदतीला सातत्याने धावून येणारे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मशाल चिन्हावर विधानसभेची सातव्यांदा निवडणूक लढत आहेत.

पान ३ वर

## खंडेरायांचा आशीर्वाद घेऊन बाबरी मुंडे यांनी ठोकला शड्डू

### प्रस्थापितांविरोधातील विस्थापितांच्या लढाईत साथ द्या -बाबरी मुंडे

**दिंद्रूड । प्रतिनिधी**

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांनी प्रचार शुभारंभाचा धूम धडाका लावला आहे. अपक्ष उमेदवार बाबरी मुंडे यांनी बुधवारी धारूर तालुक्यातील जागृत देवस्थान खंडोबा मंदिरात मल्हारी मार्तंडाचे आशीर्वाद घेत प्रचाराचे श्रीफळ वाढवून प्रचाराचा शड्डू ठोकला. लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांचे स्वप्न साकार



करण्यासाठी आपण मैदानात असून प्रस्थापितांविरोधातील या विस्थापितांच्या लढाईत मला साथ द्या असे भावनिक आवाहन बाबरी मुंडे यांनी केले.

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार बाबरी उर्फ फुलचंद मुंडे यांनी श्रीक्षेत्र देवदहीफळ येथे निवडणूक प्रचाराचा शुभारंभ केला. विविध जाती धर्मातील नागरिकांनी प्रचार शुभारंभाला उपस्थिती लावली. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या सोबत गेल्या ३० ते ४० वर्षांपासून आम्ही राजकारणात सक्रिय आहोत. जनतेची सेवा करण्यासाठी मिळालेली ही संधी वाया जाऊ देऊ नका. सर्व मतदारांनी बाबरी मुंडे यांना भरघोस मताने विजयी करण्याचे आवाहन राजेभाऊ मुंडे यांनी केले.प्रस्थापित उमेदवारांच्या विरोधात

पान ३ वर

## सौ.गिताभाभी बाळराजे पवार यांचा शहरात डोअर टू डोअर झंझावाती प्रचार ; गेवराईत आ. पवारांचा ऑटोरिक्षा सुसाट

**गेवराई । प्रतिनिधी**

गेल्या तीन दशकापासून शहरातील माय बाप जनतेने आमच्या कुटुंबावर विश्वास टाकलेला आहे. हे उपकार आमचे कुटुंब कधीच विसरणार नाही. गेवराई शहर आमचे घर असून येथील जनता ही आमची मायबाप असल्याचे समजून सेवा करत आहोत.

असे प्रतिपादन सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांनी शहरातील प्रचार दौऱ्या प्रसंगी बोलताना केले. त्यांच्या या झंझावाती प्रचार दौऱ्याने



आ.लक्ष्मण पवार यांची ऑटोरिक्षा सुसाट असल्याचे दिसत आहे.

गेवराई विधानसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रचारार्थ त्यांनी शहरातील डोअर टू डोअर जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या.

यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, बाळराजे दादा पवार व आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी नगरपालिकेच्या माध्यमातून

पान ३ वर

## महायुतीच्या सर्व उमेदवारांना विजयी करा-ॲड.तांदळे

### महायुतीच्या हाती महाराष्ट्र सुरक्षित

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात विधानसभेचे बिगुल वाजले आहे.बीड जिल्ह्यात महायुतीचे उमेदवार मा.धनंजय मुंडे, मा.प्रकाश सोळंके, मा.सुरेश धस, मा.नमिता मुंदडा, मा.विजयसिंह पंडित, मा.डॉ.योगेश क्षीरसागर हे सर्व उमेदवार महायुती कडून उभे आहेत.महाराष्ट्र राज्यात महायूती च्या काळात राज्याचा आणि आपल्या बीड जिल्ह्याचा विकास



झाला आहे.महायुती सरकार म्हणजे विकासाची हमी होय.सरकारने लाडली बहीण योजना,शेतकऱ्यांचे वीज बिल माफ,जलसिंचन चे कामे ह्या सारख्या

पान ३ वर

## घराणेशाही मोडीत काढण्यासाठी पुजा मोरेला विजयी करा

**टाकरवण । प्रतिनिधी**

गेवराई मतदार संघामधील प्रस्थापित नेत्यांच्या विरोधात बोलायला मतदार बंधू भगिनी भितात. त्यांच्या विरोधात बोलण्याची कोणी हिंमत करत नाही त्यामुळेच अनेक वर्षांपासून गेवराई मतदार संघाचा विकास खुंटलेला आहे. गेवराई मतदार संघाचा विकासाचे व्हिजन घेऊन विस्थापित चेहरा म्हणून मी ही निवडणूक लढवत आहे असे कॉर्नर सभेमध्ये बोलताना पूजा मोरे यांनी सांगितले.



गेवराई मतदार संघामधील पंडित पवार कुटुंब हे एकच आहेत आदलून बदलून सत्ता उपभोगतात व सर्वसामान्यांची पिळवणूक करतात असे देखील यावेळी पूजा मोरे यांनी सांगितले. गेवराईच्या राजकारणात कुठलंच व्हिजन

पान ३ वर

## शिरूर पट्ट्यातील गावांना विकास कामासाठी विशेष प्राधान्य देणार

फुलसांगवी : शंकर भालेकर

गेल्या पाच वर्षांमध्ये बीड मतदार संघातील शिरूर पट्ट्यातील गावाकडे आमदारांनी पाठ फिरवल्यामुळे विकास कामे होऊ शकली नाहीत.मायबाप जनतेने मला आपली सेवा करण्याची संधी दिली तर शिरूर पट्ट्यातील गावांना विशेष प्रधान्य देऊन विकासाची कामे करील असे अभिवचन महायुतीचे उमेदवार डॉ. योगेश क्षीरसागर यांनी मौजे फुलसांगवी येथे केले.



**डॉ. योगेश क्षीरसागर यांचे मतदार बांधवाना अभिवचन**

बीड विधानसभा मतदारसंघांमध्ये महायुतीतील घटक पक्षातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ( अजित पवार गटाचे ) उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांचा गुरुवार दि. ७ नोव्हेंबर रोजी बीड विधानसभा मतदार संघामध्ये समाविष्ट असलेले शिरूर तालुक्यातील गावामध्ये प्रचार दौरा आयोजित केला होता. या दौऱ्याची सुरुवात बुथ क्र.१ म्हणजेच मौजे फुलसांगवी येथून श्री.संत वामनभाऊ महाराज यांचे दर्शन घेऊन करण्यात आली होती. डॉ. क्षीरसागर यांच्या या प्रचार दौऱ्याला अगदी सकाळपासूनच उदंड प्रतिसाद मिळाला आहे . फुलसांगवी येथे सकाळी ८ वाजता खंडोबा मंदिरासमोर महायुतीच्या सर्व कार्यकर्ते व मतदार बांधवांची कॉर्नर बैठक घेण्यात आली. या बैठकीला संबोधित करताना डॉ. योगेश

पान ३ वर

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हवे असतील तर मला आमदार करा -अर्जुन खोतकर

**जालना । प्रतिनिधी**

आता लवकरच जिल्हा परिषद आणि महानगर पालिका, नगर पालिकेच्या निवडणूका होणार आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागले पाहिजे. मुख्यमंत्री म्हणून एकनाथराव शिंदे हे हवे असतील तर मला आमदार करणे गरजेचे आहे. मी आमदार झाल्यानंतर राज्याचा कॅबिनेट मंत्री नक्कीच होईल, असा विश्वास महायुतीचे (शिवसेना) उमेदवार अर्जुनराव



खोतकर यांनी व्यक्त केला.

यावेळी कुंबेफळ येथील तंटामुक्ती अध्यक्ष गोविंद गाडेकर, काँग्रेस कार्यकर्ते कडुबा गाडेकर, जनार्दन गाडेकर, मिलींद गाडेकर यांनी अर्जुनराव खोतकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला.

इंदलकरवाडी, वाघ्रुळ, कुंबेफळ (सिंदखेड) आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर कार्यालयास भेटी दिल्या. यावेळी श्री. अरविंदराव चव्हाण, अण्णासाहेब चित्तेकर, शंकुतलाताई कदम, अनवर मिर्झा बेग, प्रभाकर देवंदे, रिकंल तायड, वंदना खांडेभराड, सतीश वाहुळे, संतोष ढेंगळे, उमेश मोहिते, विजू सोनणे, पद्माकर हंडे, किशोर सवडे, शितला भारुडे, विष्णू घुले, विष्णू भुतेकर,

पान ३ वर

## मतदार संघातील मतदार मायबापांचे उपकार कधीही विसरणार नाही - पृथ्वीराज पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदार संघातील मतदारांनी आदरणीय शिवाजीराव (दादा) पंडित कुटूंबियावर जीवापाड प्रेम केलेले आहे. त्याच्याच बळावर आदरणीय शिवाजीराव दादांनी गेवराई विधानसभा मतदार संघामध्ये आपल्या राजकीय जीवनामध्ये सामान्य माणसाला डोळ्यासमोर ठेवून काम केले, तालुक्याचा सर्वांगिन विकास केला, त्यांचाच वारसा सक्षमपणे आम्ही पुढे घेवून जात आहोत.



बदलणाऱ्या काळाबरोबर आपल्याला चालायचे आहे, नवनवीन योजना, उद्योगधंदे आणि रोजगाराच्या संधी आपल्या उपलब्ध करून द्यायच्या आहेत. येणाऱ्या काळामध्ये हे सर्व साध्य करण्यासाठी महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांना विजयी करा, मतदार संघातील मतदार मायबापांचे उपकार आम्ही कधीही विसरणार नाही असे प्रतिपादन युवा नेते पृथ्वीराज जयसिंग पंडित यांनी केले. विजयसिंह पंडित यांच्या प्रचारार्थ ठिकठिकाणच्या कॉर्नर बैठकामध्ये ते मतदारांशी संवाद साधताना बोलत होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांच्या प्रचारार्थ युवा नेते पृथ्वीराज जयसिंग पंडित यांनी गेवराई विधानसभा मतदार संघ अक्षरशः पिंजून काढला आहे. त्यांनी सावरगाव, साठेवाडी, कोळगाव, गाढेवाडी, पोखरी, तरटेवाडी, माळहिवरा, मुधापूरी, शिराळा, ठाकर आडगाव, कोलतेवाडी, बेलगूडवाडी आदी गावांचा प्रचार दौरा करून उमेदवारांच्या गाठीभेटी घेतल्या. यावेळी कॉर्नर बैठकांमध्ये मतदारांशी संवाद साधताना ते पुढे म्हणाले की, आदरणीय अमरसिंह पंडित यांनी कधीही स्वार्थी

पान ३ वर

## रमेश आडसकरांचे धारूर शहरात उत्स्फूर्त स्वागत,भारतीय युवा सेनेचा पाठिंबा

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

माजलगाव विधान सभेचे अपक्ष उमेदवार रमेश आडसकर यांनी दि.७ रोजी निवडणूक प्रचाराणीमित्त धारूर शहरातील विविध समाज घटकांशी संवाद साधला त्यांच्या या संवाद रैलीस धारूर शहरांमध्ये मोठा प्रतिसाद मिळाला.

माजलगाव विधान सभेचे उमेदवार रमेश आडसकर यांनी धारूर शहरांमध्ये प्रचरणीनित्त झंझावात दिसून आला माता भगीनिनी सह धारूर करणारी मोठ्या उत्साहात स्वागत केले, सर्वच समाज घटाकडून आडसकराना मोठा पाठिंबा



**शहरातील विविध समाज घटकांशी साधला संवाद**

मिळत असल्याचे दिसले भारतीय युवा सेना चे अध्यक्ष राहुल फंने यांनी ही आपल्या समर्थकासह रमेश आडसकराना पाठिंबा दिला.मागच्या वेळी निसटता पराभव झाला असला तरी कायम धारूर कराच्या सुखदुःखात सहभागी होणारे रमेश आडसकर यांना मोठे मतधिक्या मिळणार असल्याचे चित्र त्याच्या संवाद यात्र निमित्त पाहायला मिळाले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सिद्धार्थ शिरोळे हा राजकारणातील संस्कारी चेहरा–पंकजा मुंडे

**पुणे । प्रतिनिधी**

राजकारणात संस्कारी असणाऱ्यांची, महिलांची प्रतिष्ठा राखणाऱ्यांची सर्वाधिक आवश्यकता आहे. सिद्धार्थ शिरोळे राजकारणातील संस्कारी चेहरा आहेत, असे कौतुकोद्गार भारतीय जनता पक्षाच्या नेत्या पंकजा मुंडे यांनी काढले. छत्रपती शिवाजीनगर मतदार संघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार सिद्धार्थ शिरोळे यांच्या प्रचारार्थ शिवाजीनगर गावठाण येथे आयोजित करण्यात आलेल्या महिला मेळाव्यात मुंडे बोलत होत्या.

श्री रोकडोबा देवस्थान सभागृह परिसरात आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यासाठी सुजाता सिद्धार्थ शिरोळे, पक्षाच्या प्रदेशसचिव ॲड. वर्षा डहाळे, महिला मोर्चा पुणे शहर अध्यक्षा हर्षदा फरांदे, निवेदिता एकबोटे, शिवाजीनगर महिला आघाडी अध्यक्ष अपर्णा कुऱ्हाडे, राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या लावण्या शिंदे, माजी नगरसेविका स्वाती लोखंडे, महिला आघाडी शहर सरचिटणीस भावना शेळके, अपर्णा कुऱ्हाडे, लता धायगुडे, शारदा पुनावळे, श्रद्धा शिंदे, अर्चना मुसळे उपस्थित होत्या



मला लाखोंच्या सभेपुढे बोलताना कायमच झाशीच्या राणीचे रूप घ्यावे लागते आज शिवाजीनगर येथे होत असलेल्या या मेळाव्यात मला बोलण्यातला गोडवा, सहजता आणि बहिणींशी गप्पा मारल्याचे सुख अनुभविता आले, याचा आनंद पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला.


आपले वडील गोपीनाथ मुंडे यांचा सिद्धार्थ शिरोळे यांचे वडील अनिल शिरोळे यांसोबत असलेला ऋणानुबंध आणि मैत्रीचे नाते याच्या अनेक आठवणी पंकजा यांनी जागविल्या. यावेळी बोलताना मुंडे म्हणाल्या, जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिल्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेतली तेव्हा घरोघरी शौचालय ही योजना जाहीर केली. भारतीय जनता पक्ष हा स्त्रियांचा सन्मान करणारा पक्ष असून याच पक्ष शिस्तीत सिद्धार्थ यांची जडणघडण झाली आहे. शिवाजीनगर मतदार संघात त्यांना दुसऱ्यांदा देण्यात आलेली संधी हे त्यातेच द्योतक असून त्यांच्या विजयासाठी महिलांनी पुढे सरसवा.

आजवर स्त्रीने खूप चटके सहन केले असून एका स्त्रीसाठीच रामायण महाभारत घडले आहे. आजच्या कलयुगातही स्त्रीचा हा लढा संपला नसून आज तिची परिस्थिती अधिक बिकट झाली आहे. स्त्रीयांची ही परिस्थिती सुधारण्यासाठी राज्य सरकारने आणलेली 'लाडकी बहिण' योजना ही खऱ्या अर्थाने स्त्रियांचे सक्षमीकरण करणारी योजना आहे, असेही मुंडे यांनी नमूद केले. या आधी सिद्धार्थ शिरोळे यांच्या प्रचारार्थ मतदार संघातील विविध भागात पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गोखलेनगर, कपिला सोसायटी, मंगलवाडी, रामोशी वाडी, चाफेकर पुतळा, वाकडेवाडी, शिवाजीनगर रेल्वे स्थानक, भैय्यावाडी या ठिकाणी सर्व स्तरातील, वयोगटातील नागरिकांच्या भेटी शिरोळे यांनी घेतल्या. या भेटीदरम्यान वयोवृद्ध नागरीकांनी शिरोळे यांना आशीर्वाद दिले तर लहानग्यांना त्यांच्यासोबत सेल्फी काढण्याचा मोह आवरता आला नाही. शिरोळे यांनीही या मुलांचा हट्ट पुरविला.

# 'जेईई ॲडव्हान्स' देता येणार तीनदा

**पुणे । प्रतिनिधी**

देशातील भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी), राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (एनआयटी) यांसह नामांकित शिक्षण संस्थांमधील प्रवेशासाठी होणारी 'जेईई डव्हान्स' ही परीक्षा आता विद्यार्थ्यांना तीनदा देता येणार आहे. या परीक्षेसंदर्भात नव्याने जाहीर केलेल्या नियमावलीनुसार आता सलग तीन वर्षांत जास्तीत जास्त तीन वेळा विद्यार्थी 'जेईई डव्हान्स'ची परीक्षा देऊ शकणार आहेत. त्यामुळे आयआयटी, एनआयटीमधील प्रवेशाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.




देशातील या नामांकित संस्थांमध्ये अभ्यासक्रमाला प्रवेश मिळावा, यासाठी भारतीय विद्यार्थ्यांसह परदेशस्थ भारतीय (ओसीआय), भारतीय वंशाचे नागरिक (पीआयओ) हे विद्यार्थीदेखील 'जेईई डव्हान्स' परीक्षा देतात. बी.ई. आणि बी.टेक अभ्यासक्रमासाठी होणाऱ्या जेईई मेन या परीक्षेतून जवळपास अडीच लाख विद्यार्थी हे जेईई डव्हान्स परीक्षेसाठी पात्र ठरतात. यात सर्वसाधारण प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अशा विविध प्रवर्गांच्या आरक्षणानुसार जेईई मेन परीक्षेत अव्वल ठरलेले विद्यार्थी जेईई डव्हान्स परीक्षेसाठी पात्र ठरतात. ही परीक्षा भारतीय तंत्रज्ञान संस्थेमार्फत (आयआयटी) घेण्यात येते. यंदा ही परीक्षा आयआयटी कानपूर यांच्यामार्फत होणार आहे.

आतापर्यंत विद्यार्थ्यांना केवळ दोनदा जेईई डव्हान्स परीक्षा देण्यासाठी संधी देण्यात येत होती. परंतु, 'आयआयटी कानपूर'ने नुकत्याच जाहीर केलेल्या नियमावलीनुसार आता विद्यार्थ्यांना सलग तीन वर्षांत जास्तीत जास्त तीन वेळा ही परीक्षा देण्याची संधी मिळणार आहे. परीक्षेच्या पात्रता निकषांबद्दल "https://jeeadv.ac.in/index.html' या अधिकृत संकेतस्थळावर माहिती देण्यात आली आहे.

पात्रता निकष

– विद्यार्थ्याचा जन्म एक ऑक्टोबर २००० रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा – एससी, एसटी आणि दिव्यांग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना पाच वर्षांची सूट – अशा विद्यार्थ्याचा जन्म एक ऑक्टोबर १९९५ रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा – विद्यार्थ्यांनी इयत्ता बारावीत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित अनिवार्य विषय घेणे आवश्यक – जे विद्यार्थी २०२२ मध्ये किंवा त्यापूर्वीच्या बारावी परीक्षेत पहिल्यांदा बसले होते ते पात्र ठरणार नाहीत

# आळंदीत कार्तिकी यात्रेची लगबग ; विधानसभा निवडणुकीमुळे प्रशासनावर ताण

**आळंदी । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत प्रशासन व्यस्त असताना कार्तिकी यात्रेमुळे प्रशासनावर दुहेरी ताण येणार आहे. निवडणुकीबरोबरच कार्तिकी यात्रेसाठी आळंदीत येणार्या भाविकांना सोयीसुविधा पुरविण्यासाठी स्थानिक प्रशासन, खेड तहसील, एसटी महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा आरोग्य विभाग, पोलिस आयुक्तालय व्यस्त झाले आहे. या यात्रेसाठी आठ लाख भाविक येण्याचा अंदाज आहे.

कार्तिकी यात्रेच्या पार्श्वभूमीवर शहरात विविध कामे हाती घेण्यात आली आहेत. यात्रेच्या पार्श्वभूमीवर प्रांताधिकारी अनिल दौंडे यांच्या अध्यक्षेखाली बुधवारी (दि. ६) सकाळी अकरा वाजता पालिका टाऊन हॉलमध्ये वारी पूर्वतयारी



आढावा बैठक पार पडली. यात कार्तिकी वारी नियोजनाचा आढावा घेण्यात आला. निवडणूक कार्यक्रमामुळे तहसीलदार ज्योती देवरे, हवेली विभागातील महसूलचे अधिकारी, कर्मचारी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे अधिकारी बैठकीला अनुपस्थित होते.

सदर बैठकीत पाणीपुरवठा, विद्युत, वाहतूक प्रश्न, पथ विक्रे त्यांची व्यवस्था, कचरा व्यवस्थापन, अतिक्रमण कारवाई, कायदा व सुव्यवस्था आदी महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. तसेच विभागवार आढावा घेण्यात आला. पोलिस बंदोबस्त व पर्यायी मार्गांचा वापर, याबाबत नियोजन करण्यात आले. शहराच्या वेशीवर चारही बाजूंना पार्किंग व्यवस्था व वाहतूक वळविण्याबाबत चर्चा करण्यात आली. भाविकांच्या सोयीसुविधांबाबत प्राधान्याने उपाययोजना करण्याबाबत सर्व विभागांना सूचना देण्यात आल्या. या वेळी सहायक पोलिस आयुक्त राजेंद्रसिंह गौर, आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, आळंदी नगरपरिषद मुख्याधिकारी कैलास केंद्रे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक भीमा नरके, वाहतुकीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सतीश नांदुरकर, दिघी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ निरीक्षक विनायक पाटील, वारकरी महामंडळ उपाध्यक्ष डी. डी. भोसले पाटील, माजी उपनगराध्यक्ष प्रशांत कुर्‍हाडे, सचिन गिलबिले, राजाभाऊ चोपदार, प्रमुख व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, मच्छिंद्र शेंडे, शिवसेना शहरप्रमुख राहुल चव्हाण, मंडलाधिकारी राजेंद्र वाघ, वैद्यकीय अधिकारी डॉ. इंदिरा पारखे आदी उपस्थित होते.

# शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्या पाठीत खंजीर खुपसणाऱ्यांना जागा दाखवून द्या–खासदार डॉ. अमोल कोल्हे

**ओझर । प्रतिनिधी**

शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्या पाठीत खंजीर खुपसणाऱ्यांना जागा दाखवून देण्याची हीच योग्य वेळ आहे असे प्रतिपादन शिरूर लोकसभा मतदारसंघातील खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी पिंपरीपेंढार येथे केले.

दरम्यान, आदिवासी, मराठा, धनगर, ओबीसी यांचे जातीनिहाय जनगणना करून ५०% पेक्षा जास्त मर्यादा वाढवण्याची प्रयत्न महाविकास आघाडीकडून केले जातील असे आश्वासित करून काशीराम म्हणतात त्यानुसार जिसकी जितनी संख्या भारी उनकी उतनी हिस्सेदारी याप्रमाणे जनगणना मर्यादा वाढवण्यासाठी प्रयत्न केले जातील असे आश्वासन खा.डॉ.अमोल कोल्हे यांनी दिले. महाविकास आघाडीचे उमेदवार सत्यशिल शेरकर यांच्या प्रचारा निमित्त पिंपरीपेंढार येथील



कोपरा सभेत खा. कोल्हे बोलत होते. या वेळी शिवसेना (उबाठा) पक्षाचे तालुकाप्रमुख माऊली खंडागळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जेष्ठ नेते शरद लेंडे, पुणे जिल्हा उपाध्यक्ष आनंदराव चौगुले, दादाभाऊ बगाड, तालुकाध्यक्ष तुषार थोरात, जि.प.चे.माजी सदस्य मोहित ढमाले, अंकुश आमले, शरद चौधरी, धनंजय डुंबरे, रोहिदास वेठेकर, रोहिदास कुटे, किसनराव कुटे, शिवाजीराव वेठेकर, जयरामशेठ कदम, राजूशेठ वामन, प्रकाश नवले, दत्तात्रेय वेठेकर, सुरेखाताई वेठेकर आदी मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते. खा. डॉ. अमोल कोल्हे म्हणाले कि, पिंपरीपेंढार हे आदर्श गाव आहे. ज्या गावाने स्मशान भूमीला स्वर्ग भूमी केली आहे या गावातील मतदारांनी लोकसभेला ७० टक्के मतदान लोकसभेला केले होते. यावेळी देखील ७० टक्के पेक्षा जास्त मतदान हे सत्यशील शेरकर यांना करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उमेदवार सत्यशील शेरकर म्हणाले की, केंद्र व राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे शेतीच्या पिकाला हमी भाव नाही. शेतकरी, सर्वसामान्य जनता युती सरकारच्या कारभाराला कंटाळली आहे. आता राज्यात परिवर्तनाची लाट असल्याने राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आणण्यासाठी शरदचंद्र पवार , उध्दव ठाकरे, राहुल गांधी यांना देऊन महाविकास आघाडीला भरघोस मतांनी विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी रोहिदास वेठेकर यांनी आपले विचार व्यक्त केले. पिंपरीपेंढार ग्रामस्थांनी खा.डॉ.अमोल कोल्हे, सत्यशील शेरकर यांचे उत्सपुर्त स्वागत केले.

# मीनाताई ठाकरे वसाहतीचे होणार पुनर्वसन–आमदार माधुरी मिसाळ

**पुणे । प्रतिनिधी**

गुलटेकडी परिसरातील मीनाताई ठाकरे वसाहत इंदिरानगरमधील महापालिकेच्या जागेवरील झोपडपट्टीचे एसआरए अंतर्गत त्याच जागेवर पुनर्वसन करण्यात येणार असल्याची माहिती भाजप महायुतीच्या उमेदवार आमदार माधुरी मिसाळ यांनी दिली. मीनाताई ठाकरे वसाहत, मुकुंदनगर, महर्षीनगर, प्रेमनगर परिसरात मिसाळ यांच्या प्रचारार्थ पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मिसाळ बोलत होत्या.

यावेळी माजी सभागृहनेते श्रीनाथ भिमाले, प्रविण चोरबेले, राजश्री शिळीमकर, निखिल शिळीमकर, गणेश शेरला, रेणुका पाठक, श्रीकांत पुजारी, राहुल गुंड, श्वेता होनराव, बाळासाहेब शेलार यांचा प्रमुख सहभाग होता.

मिसाळ म्हणाल्या की, महाविकास आघाडीच्या




सत्ताकाळामध्ये झोपडपट्टी पुनर्वसनाची नियमावली निर्मिती प्रक्रिया खंडित झाली होती. राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर मी सातत्याने पाठपुरावा करून एसआरएची नियमावली मंजूर करून घेतली. महापालिकेच्या ज्या जागांवर झोपडपट्ट्या आहेत त्या झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन महापालिकेने करावे ही आग्रही मागणी मान्य झाली. त्यानुसार एसआरएचा प्रायोगिक तत्त्वावरील पहिला प्रकल्प गुलटेकडी येथे सुरू होत आहे.

नेहरू रस्ता आणि महर्षीनगरमध्ये तब्बल १२ एकर जागेवर मीनाताई ठाकरे इंदिरानगर ही मोठी वसाहत आहे. जागेची मोजणी, डिमार्केशन आदी तांत्रिक प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर सर्वेक्षण सुरू केले आहे. यामध्ये दोन हजार ५५४ झोपड्या आढळून आल्या असून, त्यांचे जागेवरच पुनर्वसन होणार आहे, असे देखील त्यांनी सांगितले.

# तरुणांना तालुक्यातच रोजगार उपलब्ध करणार - शंकर मांडेकर

**पिरंगुट । प्रतिनिधी**

मुळशीतील तरुणांना रोजगार मिळत नसल्याने स्थानिक तरुणांना गाव व तालुका सोडून शहरांमध्ये रोजगारासाठी जावे लागते. तरूणांना तालुक्यात रोजगार उपलब्ध करून, गावांसह तालुका आणि मतदारसंघाचा विकासासाठी मी कटीबद्ध असल्याची ग्वाही भोर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार शंकर मांडेकर यांनी दिली.



भोर, राजगड, मुळशी विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार शंकर मांडेकर यांच्या प्रचारार्थ पिरंगुट येथे महायुतीतील घटक पक्षांच्या नेत्यांची बूथ कमिटी बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी कर्नाटकचे आमदार डॉ. वाय. ए. नारायण स्वामी, माजी आमदार शरद ढमाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस नंदूशेठ भोईर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष अंकुश मोरे, कात्रज दुध संघाचे संचालक कालिदास गोपालघरे, ज्येष्ठ नेते किसन नांगरे, राष्ट्रवादी काँग्रेस राजगडचे तालुकाध्यक्ष किरण राऊत, मुळशी पंचायत समितीचे माजी सभापती बाबा कंधारे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष सचिन अमराळे, भाजप तालुकाध्यक्ष राजाभाऊ वाघ, भाजप युवा मोर्चाचे मुळशीचे तालुकाध्यक्ष अनुप मारणे आदी मान्यवर उपस्थित होते.

# निवडणुकीसाठी पीएमपीच्या ९६८ जादा गाड्या

**पुणे । प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी पीएमपी प्रशासनाकडून ९६८ जादा गाड्या देण्यात येणार आहेत. याबाबतची मागणी प्रशासन पातळीवरून पीएमपीला आली होती. त्यानुसार १९ आणि २० नोव्हेंबर रोजी निवडणूक कामकाजासाठी पीएमपीच्या जादा गाड्या देण्यात येणार आहेत.



पीएमपीच्या ताफ्यात सध्या १८८० बस गाड्या आहेत. त्यांपैकी सरासरी १५२० बस गाड्या प्रत्यक्षात मार्गांवर असतात. उर्वरित गाड्या ब्रेक डाऊन, देखभाल व दुरुस्ती, चार्जिंग यांसारख्या अन्य कारणांसाठी डेपोंमध्येच असतात. या मार्गावरील गाड्यांमार्फत दररोज ९ ते १० लाखांच्या घरात प्रवासी प्रवास करतात. त्यातच आता १९ आणि २० तारखेला निवडणुकीसाठी ताफ्यातील ९६८ बस देण्यात येणार आहेत. त्यामुळे मार्गावर प्रवाशांसाठी बस अपुर्या पडणार आहेत. त्यामुळे पीएमपी प्रशासनाने निवडणुकीच्या कामकाजासोबतच या दिवशी पुणेकर प्रवाशांचा प्रवास वेगवान, सुखकर होण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

# नगर रस्ता लवकरच १०० टक्के सिग्नलमुक्त होणार - आमदार सुनील टिंगरे

**पुणे । प्रतिनिधी**

नगर रस्त्यावरील येरवडा ते खराडीपर्यंतचा वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी बीआरटी काढण्याबरोबरच उड्डाणपूल आणि ग्रेड सेपरेटर उभारण्याच्या कामांना सुरवात झाली आहे. त्यामुळे नगर रस्ता लवकरच शंभर टक्के सिग्नल मुक्त होणार असल्याचा दावा वडगाव शेरी मतदारसंघाचे ( Vadgaon Sheri -ssembly Constituency) राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे उमेदवार आमदार सुनील टिंगरे (चङ-डींपळश्र ढळपसीश) यांनी केला.

आमदार टिंगरे यांच्या प्रचारार्थ गुरुवारी वडगाव शेरी



भागात दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आमदार टिंगरे यांनी मतदारांशी संवाद साधत ही माहिती दिली. टिंगरे म्हणाले, की या रस्त्यावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर झाला होता. ही कोंडी सोडविण्यासाठी आपण सातत्याने पुढाकार घेतला आहे. बीआरटी मार्गिकेमुळे अपघात आणि कोंडी वाढल्याने नागरिकांसह, परिसरातील उद्योग, व्यवसायांना त्याचा फटका बसत होता. त्यामुळे थेट विधिमंडळात आवाज उठवून आणि महापालिका, पोलिसांकडे पाठपुरावा करून येरवडा ते सोमनाथनगरपर्यंतची बीआरटी मार्गिका काढण्यासाठी लढा दिला. सोबतच या रस्त्यावर केंद्र शासनाच्या माध्यमातून शिरूर ते वाघोलीपर्यंत होणारा दुमजली उड्डाणपूल थेट रामवाडीपर्यंत आणण्यासाठी पाठपुरावा करत हा प्रश्न मार्गी लावला. त्यामुळे आगामी काळात नगर रस्ता शंभर टक्के सिग्नलमुक्त होईल. माजी नगरसेवक योगेश मुळीक, सुनीता गलांडे, संदीप जराड, ज्ञानेश्वर शिंदे, उषा कळमकर, सतीश म्हस्के, नारायण गलांडे, महेंद्र गलांडे, माजी सरपंच भिकोबा गलांडे, संगम शंकर, मुकुंद गलांडे, महेश गलांडे, अनिल नवले, राकेश परदेशी यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आदी या वेळी उपस्थित होते.

# विद्यापीठ, महाविद्यालय संकुलात प्लॅस्टिकबंदी

**पुणे । प्रतिनिधी**

प्लॅस्टिकच्या वाढत्या वापरामुळे होणारे दुष्परिणाम रोखण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आता विद्यापीठ व महाविद्यालयाच्या संकुलात प्लॅस्टिकवर बंदी घालण्यात आली आहे. या संदर्भात यूजीसीने मार्गदर्शक तत्वे प्रसिद्ध केली आहेत.

उच्च शिक्षण संस्थांनी एकदा वापरल्या जाणाऱ्या प्लॅस्टिकच्या व्यापक समस्येचा सामना करण्यासाठी त्यांचे प्रयत्न वाढवावेत. हा उपक्रम केवळ आपल्या पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठीच नव्हे, तर मानवी




आरोग्याचे रक्षण, कचरा व्यवस्थापन, हवामान बदलाशी लढा आणि आर्थिक स्थिरतेला प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे, असेही यूजीसीने म्हटले आहे. सर्व शैक्षणिक संस्थानी उपहारगृहसह इन्स्टिट्यूटच्या परिसरात प्लॅस्टिकवर बंदी घालावी. प्लॅस्टिकच्या हानिकारक प्रभावांबद्दल जागरूकता मोहिमेसाठी शैक्षणिक संस्थांनी कार्यशाळा आयोजित करावीत. सर्व विद्यार्थ्यांना संस्थेत प्लॅस्टिकच्या वस्तू आणू नयेत, असे आदेश द्यावेत. विद्यार्थ्यांना त्यांच्या कुटुंबांना प्लॅस्टिकच्या हानिकारक प्रभावांबद्दल जागरूक करण्यासाठी आणि त्यांचे घर प्लॅस्टिकमुक्त बनवण्यासाठी प्रोत्साहित करावेत. प्लॅस्टिकच्या बाटल्यांचा वापर टाळण्यासाठी संस्था विद्यार्थ्यांसाठी मुबलक प्रमाणात पिण्याचे पाणी उपलब्ध करून देतील. तसेच कापडी पिशव्या, कागदी पिशव्या इत्यादी पर्यायी उपायांच्या वापरास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतील, असेही यूजीसीने नमूद केले आहे.